ISSN 2278-5655

नोव्हेंबर- डिसेंबर,2025

खंड-XIV, विशेष अंक- III(b)

AMIERJ

अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल

DOI Indexed Journal

SJIF Impact Factor: 8.343

2025

OPEN ACCESS

संपादक

प्रो.(डॉ.) पांडुरग ईश्वरा भोसले

प्रा.संग्राम सीताराम गोसावी

ISSN-२२७८-५६५५

AMIERJ

अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल्स

एक बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय द्वि-मासिक संदर्भित जर्नल

प्रिंट/ऑनलाइन पीअर रिव्ह्यू जर्नल

SJIF Impact Factor: 8.343 DOI Indexed Journal

संपादक

प्रो.(डॉ.) पांडुरंग ईश्वरा भोसले

प्रा.संग्राम सीताराम गोसावी

अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल्स
एक बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय द्वि-मासिक संदर्भित जर्नल
प्रिंट/ऑनलाइन पीअर रिव्ह्यू जर्नल
SJIF Impact Factor: 8.343
DOI Indexed Journal
ISSN-२२७८-५६५५

नोव्हेंबर- डिसेंबर,2025

खंड-XIV, विशेष अंक- III(b)

कॉपीराइट:

© सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पुनरुत्पादित, पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित किंवा कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे प्रसारित केला जाऊ शकत नाही, इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग आणि/किंवा अन्यथा.

अस्वीकरण:

जर्नलमध्ये व्यक्त केलेली सर्व मते वैयक्तिक योगदानकर्त्यांची आहेत. लेखकांनी केलेल्या विधानांसाठी किंवा व्यक्त केलेल्या मतांसाठी संपादक आणि प्रकाशक जबाबदार नाहीत.

व्यवस्थापकीय संपादक आणि प्रकाशक: प्रमिला डी.ठोकळे (८८५००६९२८१)
(**ईमेल आयडी:** amierj64@gmail.com)

प्रकाशन:
अर्हत प्रकाशन आणि अर्हत जर्नल्स
158, हस्तपुष्पम बिल्डिंग, बोरा बाजार सेंट,
बोराबाजार परिसर, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र 400001
ईमेल आयडी: aarhatpublication@gmail.com
M-8850069281

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III(b) Nov– Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

Index

Sr. No.	Title & Author	Page No.
1	भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान *डॉ. सौ. उज्वला सुनिल लांडगे*	1
2	भाषांतरातील आव्हाने *प्रो. डॉ. प्रभंजन चव्हाण*	5
3	भाषांतरातील आव्हाने *डॉ. सुमित बबन साळुंखे*	12
4	भाषांतर आणि जाहिरातलेखन *डॉ. अतुल नारायण चौरे*	18
5	भाषांतर स्वरूप : तत्वे आणि प्रक्रिया *डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके*	26
6	भाषांतरित कादंबऱ्यांमधील स्त्रीजीवन *डॉ. अमोल सुभाष कवडे*	30
7	**भाषांतराचे महत्त्व** *डॉ. आरती विजयकुमार भोसले*	35
8	अनुवादाचे महत्त्व आणि रोजगाराच्या नव्या संधी *डॉ. कांचन विजय नलावडे*	38
9	भाषांतरातील आव्हाने *डॉ. क्रांती हरेश पैठणकर*	42
10	आधुनिक कालखंडात तौलनिक साहित्याचे स्वरूप व महत्त्व *डॉ. गजानन विठ्ठल भोसले*	50
11	डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व *डॉ. गणेश निवृत्ती चौधरी*	58
12	गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या दलित कथा *प्रो. डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे*	62
13	भाषांतर आव्हाने, मर्यादा, अडचणी आणि त्यावरील उपाय *प्रा. डॉ. सौ. जयश्री कृष्णा शहाणे*	67
14	डिजिटल युगात इंग्रजी भाषांतराचा प्रभाव *डॉ. दीपक गायकवाड*	72
15	भाषांतर आणि अभिजात साहित्य *डॉ. नूतन लोणकर – नेवसे*	77
16	भाषांतर : एक कौशल्य *डॉ. पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन*	81
17	भाषांतरातील भाषिक आव्हाने *डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम*	87
18	भाषांतराच्या दृष्टीने सुभाषिताचे महत्त्व *प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक*	93

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III(b) Nov– Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

19	भाषांतरातील आव्हाने *प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे*	98
20	भाषांतर साहित्य सिद्धांत व प्रकार *प्रा. डॉ. रेश्मा रमेश दिवेकर*	103
21	भाषांतर आणि सांस्कृतिक समस्या *प्रा. डॉ. लांडे एस. डी.*	108
22	डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व *डॉ. वसंत यशवंत गावडे*	114
23	डिजिटल भाषांतर प्रणालीचा मराठी भाषेवरील परिणाम : अनुकूलता, मर्यादा आणि भाषिक संवेदनशीलतेचा अभ्यास *डॉ. विक्रम जाधव व डॉ. माळी बी. बी.*	120
24	भाषांतर व अनुवाद: स्वरूप व वैशिष्ट्ये *डॉ. शामराव ला. गायकवाड*	128
25	कविता – भाषांतर *प्रा. डॉ. संगीता पैकेकरी*	133
26	भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरणारी डॉ. अब्दुल कलाम यांची अनुवादित ग्रंथसंपदा *प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात*	138
27	मध्ययुगीन मराठी तौलनिक साहित्याचे स्वरूप *डॉ. संतोष काशीद*	146
28	संत साहित्य आणि भाषांतर *प्रा. (डॉ.) सविता अशोक माळी*	150
29	भाषांतर-अनुवाद-रूपांतराने जागतिक साहित्यप्रसारास चालना *डॉ. सायली आचार्य*	155
30	भाषांतरकार: आवश्यक गुण आणि आव्हाने *प्रो . डॉ. सुभाष दिनकर आहेर*	162

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान

** डॉ. सौ. उज्वला सुनिल लांडगे*

** सहा. प्राध्यापक, एस.एम.आर.के.बी.के.ए.के.महिला महाविद्यालय नाशिक.*

सारांश :

भाषा ही विचार व्यक्त करण्यासाठी महत्त्वाचे माध्यम आहे आणि जगात सुमारे तीन हजार पेक्षा जास्त भाषा बोलल्या जात आहेत. अशा परिस्थितीत विचारांची देवाणघेवाण होते, ज्ञानाचा प्रसार होतो तसेच विविध भाषांमधील संवाद सुलभ होण्यासही मदत होते. प्रत्येक देशातील संस्कृती भिन्न आहे. भाषांतरामुळे ज्ञान आणि संस्कृतीचेही आदान प्रदान होते म्हणून जागतिक पातळीवर सहकार्याची भावना वाढीस लागते. शास्त्रीय लेखन, कथा, कादंबरी, चरित्रे अशा विविध साहित्य प्रकारांचे भाषांतर केले जाते तसेच तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी देखील भाषांतराची गरज असते.

महत्त्वाचे शब्द *– आदानप्रदान, बहुभाषिक, मूलनिष्ठ, लक्षनिष्ठ, बौद्धिक विकास, छाया*

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रास्ताविक :

भाषा ही विचार व्यक्त होण्यासाठी महत्त्वाचे माध्यम आहे तर भाषांतर म्हणजे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आशयाचे परिवर्तन घडवून आणणे. वेगळ्या भाषांमधून मजकूराचा अर्थ नेमका आणि स्पष्टपणे दुसऱ्या भाषेत रूपांतर करणे हेच भाषांतर आहे. यामध्ये शब्दांचे, वाक्यरचनेचे आणि सांस्कृतिक संदर्भांचे योग्य सुसंगत रूपांतरण केले जाते. "जगात सुमारे तीन हजार भाषा आहेत. असे भाषा वैज्ञानिक मानतात. विविध भाषांमध्ये वेगवेगळ्या कारणांसाठी संपर्क असणे आवश्यक ठरलेले आहे. प्रत्येक व्यक्तीला या सर्व किंवा यांच्यापैकी अनेक भाषा शिकणे ही गोष्ट अशक्यच म्हणायला हवी तेव्हा, ज्या व्यक्तींना एकापेक्षा अधिक भाषा अवगत झालेल्या आहेत त्यांनी भाषांतर करून हा संपर्क इतरांसाठी साधून देणे आवश्यक आहे. साहित्याच्या क्षेत्रात भाषांतर ही गोष्ट नवीन नाही प्रशासन आणि व्यापार उद्दीम या क्षेत्रामध्ये ही भाषांतराची आवश्यकता बहुभाषिक समाजांमध्ये विशेष भासते."[१]

भाषांतर करताना फक्त शब्दांची समानता न ठेवता, त्यामागील अर्थ, भाव, आणि सांस्कृतिक संदर्भ देखील जपले जातात. त्यामुळे मूळ मजकूराचा अर्थ आणि भाव कायम राहतो. भाषांतरात अनेक पद्धती, शैली, आणि तंत्रांचा उपयोग केला जातो, जेणेकरून मूळ संदेश योग्य रीतीने दुसऱ्या भाषेत पोहोचतो.

भाषांतर :

मराठीत अनेक भाषांमधून भाषांतराच्या मार्गाने आलेले वांड्.मय मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. हिंदी, इंग्रजी,

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

बंगाली, कानडी यासारख्या भाषांमधून आलेल्या कादंबऱ्या, कथा, कविता, शास्त्रीय तसेच ललित वांड्.मय मोठ्या प्रमाणात दिसून येते भाषांतर हे ज्ञानाच्या कक्षा रुंदवण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण कार्य करत असताना दिसून येते. भाषांतराचे फायदे म्हणजे विविध भाषा-भाषांमधील संवाद सुलभ होतो, ज्ञान आणि संस्कृतींचे आदान-प्रदान होते तसेच जागतिक पातळीवर सहकार्यात वाढ होते. भाषांतरामुळे लोकांना नवीन विचार, माहिती, आणि अनुभव सहजपणे मिळू शकतात. "भाषांतर शब्दाचा अर्थ सांगायचा तर दुसरी भाषा एवढाच आहे. अन्य भाषा इतिहास तरम म्हणजे एका भाषेचा आशयाला अन्य भाषेत आणणे एवढाच अर्थ सांगावा लागतो. संस्कृत भाषेमध्ये भाषांतराला 'छाया' असे म्हणतात. छाया म्हणजे सावली, प्रतिबिंब, प्रतिमा इत्यादी होय जशी मूळ कृती तशीच तिची छाया असणार हे उघडच आहे. भाषांतर म्हणजे मूळ कृतीची उभेउभ प्रतिकृती असावी अशी अपेक्षा असते. आरशातील आपले प्रतिबिंब म्हणजे आपणच असतो तीच भूमिका चांगल्या दर्जाच्या भाषांतराबद्दल केली जाते" [२]. भाषांतर करायला दोन्ही भाषांचे ज्ञान व उपयोजन हेही आवश्यक आहे. तसेच मूळ उताऱ्याचे पूर्णतः आकलन असणेही आवश्यक असते. अन्यथा भाषांतरात अडथळे येतात म्हणजे शब्दांची अचूकता, सांस्कृतिक तफावत, वाक्यरचनेची जुळवाजुळव, आणि मूळ मजकूराचा भाव जपणे. याशिवाय, भाषाच्या विशेष वैशिष्ट्यांचा विचार करणे आणि भाषांतर करताना होणारे संदर्भ बदल यांमुळे अडचणी येऊ शकतात.

भाषांतराचे प्रकार : भाषांतराचे दोन प्रकार आहेत. मूलनिष्ठ भाषांतर व लक्ष्यनिष्ठ भाषांतर. मूलनिष्ठ भाषांतरात एखाद्या कलाकृतीचे भाषांतर करताना मूळ भाषेतील शब्द त्यांची रचना तसेच वाक्यरचना, म्हणी, वाक्प्रचार यांचा अर्थ न बदलता शब्दशः भाषांतर करण्यावर विशेष कटाक्ष असतो. शब्दाला प्रतिशब्द, वाक्याला प्रति वाक्य दिसून येते मात्र अशा भाषांतरातून मूळ लेखनातील विचारांच्या आकलनास अडथळा निर्माण होतो. मूळ भाषा समजून घेणे हा भाषांतराचा उद्देश नसतो तर, त्या कलाकृतीमध्ये आशय समजून घेणे हा मुख्य उद्देश असल्यामुळे मूलनिष्ठ भाषांतर हे विशेष वापरले जात नाही. मात्र लक्ष्यनिष्ठ भाषांतरामध्ये आशय किंवा अर्थ यांना विशेष महत्त्व दिले जाते किंबहुना हेच मुख्य लक्ष्य असते. भाषेकडे फक्त विचारांचे साधन म्हणून पाहिल्याने लेखनातील विचार अन्य भाषेत चपखलपणे परावर्तित करून मुख्य आशय व्यक्त केलेला असतो. विचाराला, ज्ञानाला, माहितीला महत्त्व असणाऱ्या व्यवहारिक व तांत्रिक, शास्त्रीय क्षेत्रातही लक्ष्यनिष्ठ भाषांतराने ज्ञानाचा प्रसार होणे शक्य होते. तसेच मूळ लेखनातील सहजता, खेळकरपणा, प्रसन्नता, मिश्किलता हे सर्व भाषांतरामध्ये जपलेले दिसून येणे अपेक्षित असते. ललित लेखन, कथा, कविता, यांच्या भाषांतरामध्ये लक्ष्यनिष्ठ भाषांतर प्रकाराचा विशेष उपयोग दिसून येतो. लक्ष्यनिष्ठ भाषांतरामध्ये सामान्यतः दोन प्रकार दिसून येतात.

१.शास्त्रीय लेखनाचे भाषांतर :

यात "भाषा विज्ञानासारख्या क्षेत्रातील भाषाविषयक नवा दृष्टिकोन भाषांतर- रूपांतर- अनुवाद इत्यादी प्रकाराने मराठीत आणला गेला. मराठीच्या संदर्भात त्या विचाराला चालना मिळाली आणि मराठीचे भाषा वैज्ञानिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न मराठी भाषेतज्ज्ञ करू लागला. मराठी भाषिकाला जसा याचा फायदा झाला तसाच मराठी भाषेलाही ज्ञान कक्षा

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

रुंदावण्याच्या संदर्भात त्याचा उपयोग झाला. मराठी संस्कृत मधील भाषा विषयक विचार तौलनिक पातळीवर नव्याने करण्याची गरज भागविली गेली. भाषांतराच्या प्रत्येक क्षेत्रात असा तौलनिक विचार त्या त्या अन्य भाषेत सुरू करून देण्याचे कार्य भाषांतराने गतिमान केले. त्या दृष्टीने वाणिज्य व शास्त्र या क्षेत्रातील परिभाषा घडायला ही प्रोत्साहन मिळाले".[३]

२. कथा कादंबरी इत्यादी साहित्य प्रकारांचे भाषांतर - उदा. कन्नड साहित्यातील काही काव्ये किंवा कथा मराठीत अनुवादित केलेल्या आहेत, जसे की, कन्नड कवींच्या रचनांचे मराठी रूपांतर. त्याचप्रमाणे, तेलुगु साहित्यातील काही कथा किंवा कादंबऱ्या मराठीत आणलेल्या आहेत. अशा प्रकारे, विविध भाषांमधून आलेली ज्ञान ही मराठीत सहज उपलब्ध होते. कोणताही साहित्यप्रकार जेव्हा भाषांतरित केला जातो तेव्हा त्याचे काही नियम कटाक्षाने बाळावे लागतात जसे "भाषांतरित लेखनाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे ते भाषांतरित असूनही भाषांतरीत आहे असे वाटता कामा नये. हा होय ज्या भाषेतून ते लेखन आलेले असते त्या भाषेचा पुसट सुद्धा ठसा न उरू देता ज्या भाषेत ते लेखन भाषांतरीत होत आहे त्या भाषेतील ते स्वतंत्र लेखन आहे असे वाटणे हा भाषांतराच्या कौशल्यातील प्रमुख विशेष म्हणून सांगावा लागेल"[४]

अनेक लोकप्रिय आत्मकथन, चरित्रे, कथा, नाटक, कादंबऱ्या यांचे भाषांतर सातत्याने करणे सुरू असते. उदा. महात्मा गांधींच्या आत्मकथेला इंग्रजीत रूपांतर करणे, किंवा शेक्सपियरच्या नाटकांचे मराठी अनुवाद, किंवा पाश्चात्य काव्याचा भारतीय भाषांमध्ये रूपांतर, हे सर्व प्रत्यक्ष उदाहरणे आहेत.स्वामी विवेकानंदांच्या अनेक ग्रंथांचा मराठीत अनुवाद झाला आहे. उदा. त्यांचे 'राजयोग', 'ज्ञानयोग', 'भक्तियोग' या पुस्तकांचे मराठी रूपांतर उपलब्ध आहे. तसेच, त्यांच्या विविध व्याख्यानांचाही मराठी अनुवाद अनेक वेळा केलेला आहे. यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार मराठीत सहज होतो. तसेच विनोबा भावेंच्या अनेक वैचारिक लेखनाचा अनुवाद अनेक भाषांमध्ये झाला आहे. उदा. त्यांचे 'भूदान आंदोलन'वरील लेखन, 'अहिंसा आणि सत्य' या विषयांवरील विचार, तसेच त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अनुवाद इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलुगु आणि इतर अनेक भाषांमध्ये झाला आहे. यामुळे त्यांचे विचार व्यापक प्रमाणावर पोहोचले आहेत.विनोबा भावेंच्या 'गीताई' हा ग्रंथ खूपच प्रसिद्ध आहे आणि तो अनेक भाषांमध्ये अनुवादित झाला आहे. उदा. इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलुगु, बंगाली, गुजराती आणि इतर अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये 'गीताई' चा अनुवाद झाला आहे. त्यामुळे त्याचे विचार आणि तत्त्वज्ञान जगभर पोहोचले आहे.

"फक्त भाषेचा विकासच नाही तर एखाद्या प्रदेशाच्या बौद्धिक विकासातही भाषांतराची विशेष भूमिका असू शकते. पूर्वी लॅटिन ग्रीक अशा अनेक भाषातील ग्रंथांची अरबी भाषेच्या माध्यमातून युरोपीय भाषेत अनेक भाषांतरे झाली त्यामुळे युरोपाच्या मध्ययुगातील अज्ञानरूपी अंधकार होता तो या भाषांतरीत झालेल्या ग्रंथातून नष्ट झाला आणि नवीन पहाट उदयास आली आपल्याकडे देखील मध्ययुगात इंग्रजी व संस्कृत मधून अनेक भाषांतरे झाली त्यालाच आधुनिक युगाची नांदी असे देखील म्हटले जाते. 'भाषांतराचे महत्त्व ओळखल्यामुळेच वेळोवेळी भाषांतरांना उत्तेजन देण्याचे

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

योजना पूर्वक भाषांतरे करून घेऊन ती प्रकाशित करण्याचे प्रयत्न झाले दीडशे वर्षांपूर्वीची 'दक्षिणा प्राइस कमिटी' आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर 'साहित्य संस्कृती मंडळा'चा भाषांतर विभाग याची उदाहरणे आपल्याला माहीत आहेतच. सोवियत रशियानेही आपल्या संघराज्यातील कमी विकसित भाषांचा विकास व्हावा म्हणून व अन्य राजकीय उद्दिष्टांसाठी भारतातील व अन्य आशियाई व आफ्रिका राष्ट्रातील भाषातून सुमारे १५ संघराज्य भाषांतर करून घेऊन प्रकाशित केली होती"[५]

समारोप :

स्वभाषांतरामुळे विकसनशील देशात ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात परिणामी साहित्य क्षेत्रातील प्रगतीस वाव मिळतो. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करीत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते तर कधी अतिशय सुलभ रीतीने भाषांतर करणे शक्य होते. जसे"मराठीमध्ये शब्दांना विकार मोठ्या प्रमाणात होतात तसे इंग्लिशमध्ये होत नाही एका अर्थाने विकारी शब्दांची भाषा ती वापरणाऱ्यांना जास्त स्वातंत्र्य देते कारण विशिष्ट वाक्याच्या शब्दांचा क्रम बदलल्याने व्याकरणीकरचनेची बहुदा आणि होत नाही"६ भाषांतर म्हणजे भाषांतरकाराच्या प्रतिभेला आव्हान असते आणि तो त्याच्या कुशलतेने ती पेलतो.

निष्कर्ष :

१. भाषांतर ही श्रेष्ठ कला आहे.

२. भाषांतर हे विशेष शास्त्र आहे.

३. भाषांतर ही काळाची,ज्ञानाची गरज आहे.

४. भाषांतरित कलाकृती संस्कृती, भाषा,ज्ञान,साहित्याचे प्रतिनिधित्व करते.

५. भाषांतर म्हणजे भाषांतरकाराच्या प्रतिभेला आव्हान असते.

संदर्भ:

१. *आधुनिक भाषा विज्ञान सिद्धांत आणि उपयोजन, मालशे, मिलिंद, लोकवाङ्मय गृह, सहावी आवृत्ती, सप्टेंबर २०१९, पृष्ठ क्र.११८*

२. *व्यावहारिक मराठी, गोविलकर, लीला व इतर, स्नेहवर्धन, १ मार्च २००४, पृष्ठ १३०*

३. *तत्रैव, पृष्ठ १३१*

४. *तत्रैव, पृष्ठ १३२*

५. *भाषेतून भाषेकडे आणि भाषांतराकडे, प्र. ना. परांजपे प्रकाशन, ३० सप्टेंबर २०१७, पृष्ठ ५५*

६. *भाषांतर आणि भाषा, विलास सारंग, मौज प्रकाशन, १ फेब्रुवारी २०११, पृष्ठ १*

Cite This Article:

डॉ. सौ. लांडगे उ. सु. (2025). भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान. **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 1–4).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भाषांतरातील आव्हाने

*प्रो. डॉ. प्रभंजन चव्हाण

*प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, रयत शिक्षण संस्थेचे, डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध , पुणे -६७

सारांश :

भाषांतर ही केवळ भाषिक देवाणघेवाण नसून ती दोन संस्कृती, विचारसरणी आणि जीवनदृष्टी यांच्यातील संवादाची प्रक्रिया आहे. एका भाषेतील अर्थ, भाव आणि संदेश दुसऱ्या भाषेत अचूक व प्रभावीपणे व्यक्त करणे हे अत्यंत जटिल कार्य आहे. या प्रक्रियेत भाषांतरकाराला अनेक प्रकारची आव्हाने येतात. भाषिक, सांस्कृतिक, भावनिक, तांत्रिक, कायदेशीर, तसेच नैतिक स्वरूपाची ही आव्हाने असतात.

भाषिक पातळीवर, शब्दशः भाषांतरामुळे अर्थाचा विपर्यास होण्याचा धोका असतो; वाक्यरचना, बहुअर्थी शब्द आणि व्याकरणातील फरक या गोष्टी भाषांतराची गुंतागुंत वाढवतात. सांस्कृतिक आव्हानांत, प्रत्येक भाषेतील परंपरा, प्रथा, म्हणी आणि संस्कृतिवाचक संज्ञा यांचे समतुल्य शब्द शोधणे कठीण ठरते.

साहित्यिक भाषांतरात शब्दांचा अर्थच नव्हे तर सौंदर्य, लय आणि अनुभव जपावा लागतो. "एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे अनेकजणांपर्यंत पोहोचणार असते आणि कायमची उपलब्ध राहणार असते. याशिवाय, भाषांतरामुळे पुनर्निर्मितीचा आनंद मिळतो तो वेगळाच! माहितीपर किंवा विज्ञानक्षेत्रातील भाषांतरे करणे व साहित्यकृतीची भाषांतरे करणे, यात फार मोठा फरक आहे. माहितीपर भाषांतरामध्ये वस्तुनिष्ठ आणि सुबोध असे भाषांतर करण्याला महत्त्व आहे. मात्र साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक परिस्थितीचा, ऐतिहासिक काळाचा, परकीय भाषेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे, त्या भाषेची उपजत समज आणि अभ्यासपूर्ण ज्ञान असावे लागते."१ विज्ञान-तंत्रज्ञान आणि कायदा यांसारख्या क्षेत्रांत अचूकता, पारिभाषिक सुसंगती आणि स्पष्टता आवश्यक असते.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

भाषांतर म्हणजे काय?

एका भाषेतील (मूळ भाषा) अर्थ, भावार्थ आणि संदेश दुसऱ्या भाषेत (लक्ष्य भाषा) अचूकपणे व योग्य पद्धतीने व्यक्त करणे म्हणजे भाषांतर. एका भाषेतील (मूळ भाषा) अर्थ, भावार्थ आणि संदेश दुसऱ्या भाषेत (लक्ष्य भाषा) अचूक आणि योग्य पद्धतीने व्यक्त करणे म्हणजे भाषांतर होय. यामध्ये केवळ शब्दांतर होत नाही, तर त्या शब्दांच्या मागील अर्थ, संदर्भ, संस्कृती आणि भावना या सर्व गोष्टींचा समतोल राखला जातो.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

भाषांतरातील प्रमुख आव्हाने :

भाषांतर म्हणजे फक्त एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत टाकणे नव्हे, तर तो एक सर्जनशील आणि सांस्कृतिक संवादाचा प्रकार आहे. "भाषांतरातील भाषिक समस्यांच्या तुलनेने सांस्कृतिक समस्या अधिक खोलवर रुजलेल्या असतात. त्यामुळे भाषिक समस्याचे विश्लेषण करून त्यांवरील उपाययोजना ज्याप्रमाणे काही ठाम प्रमाणावर करता येते, तसे सांस्कृतिक समस्यांच्या बाबतीत करणे शक्य होत नाही. सर्जनशील लेखनामध्ये भाषिक समस्यांपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक समस्या उपस्थित होतात. 'कुंकू', 'माहेर', 'उष्टा' अशा ठिकाणी मराठी शब्दांचे इंग्रजी भाषांतर, वा 'रोमँटिक', 'हनिमून' अशा इंग्रजी शब्दांचे मराठी भाषांतर करण्याचा प्रयत्न करून पाहिल्यास सांस्कृतिक समस्यांच्या खोल मुळांची कल्पना येईल. अशा वेळी हे शब्द लिप्यंतर करून लक्ष्यभाषेत वापरणे व त्यांच्यावर स्पष्टीकरणात्मक टीपा देणे, किंवा एखादा कामचलाऊ प्रतिशब्द योजणे आणि त्याचा सांस्कृतिक आशय, संदर्भ व पुनरुक्ती ह्यांच्यामुळे तो यात जाईल असा प्रयत्न करणे, असे काही पर्याय भाषांतरकर्त्यापुढे असतात."[२]

भाषांतरकाराला दोन्ही भाषांचे व्याकरण, शब्दसंपदा, संस्कृती आणि भाषाभान यांचा सखोल अभ्यास आवश्यक असतो. याच प्रक्रियेत अनेक भाषिक आणि शाब्दिक अडचणी येतात.

१.भाषिक आणि शाब्दिक आव्हाने :

(अ) शब्दशः भाषांतराचा धोका

भाषांतर करताना जर प्रत्येक शब्दाचा तसाच अर्थ दुसऱ्या भाषेत टाकला, तर वाक्याचा खरा भावार्थ हरवतो आणि ते हास्यास्पद, कृत्रिम किंवा अगम्य वाटू शकते. शब्दशः भाषांतर टाळून, वाक्याचा संदर्भानुरूप अर्थ शोधणे आवश्यक आहे.

(आ) बहुअर्थी शब्द

एका भाषेतील एखाद्या शब्दाला अनेक अर्थ असू शकतात. भाषांतर करताना योग्य अर्थ निवडणे ही मोठी अडचण असते, कारण तो अर्थ वाक्याच्या संदर्भानुसार बदलतो. म्हणूनच भाषांतरकाराने शब्दाचा अर्थ निवडताना संदर्भ, भावार्थ, आणि वापराचा प्रसंग ओळखणे आवश्यक आहे.

(इ) वाक्यरचना

प्रत्येक भाषेची स्वतःची व्याकरणरचना आणि वाक्यबंध असतो. मूळ भाषेतील वाक्य जसाच्या तसा लक्ष्य भाषेत वापरल्यास तो कृत्रिम, गुंतागुंतीचा किंवा व्याकरणदृष्ट्या चुकीचा वाटू शकतो.म्हणूनच भाषांतरात व्याकरणिक सुसंगती आणि भाषेचा नैसर्गिक प्रवाह अत्यंत आवश्यक आहे.

(ई) वाक्प्रचार आणि लोकोक्तींचे भाषांतर

भाषांतर ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती दोन भिन्न संस्कृती, विचारपद्धती आणि भावविश्व यांमधील संवाद प्रक्रिया आहे. एखाद्या भाषेतील वाक्प्रचार आणि लोकोक्ती हे त्या समाजाच्या जीवनानुभवातून, संस्कृतीतून आणि भाषिक परंपरेतून निर्माण झालेले असतात.

वाक्प्रचार आणि लोकोक्तींचे भाषांतर हे भाषांतरकारासाठी सर्वात मोठे आव्हान आहे. हे फक्त भाषेचे नव्हे तर संस्कृतीचे, भावविश्वाचे आणि विचारपद्धतीचे भाषांतर आहे. "भाषांतर म्हणजे एका भाषेतील संदेश दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे. या प्रक्रियेमध्ये

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

भाषांतरकाराला किमान दोन भाषा येणे आवश्यक असते; एक मूळ भाषा, म्हणजे मुळात ज्या भाषेत संदेश चिन्हित झालेला आहे ती भाषा, आणि आणि दुसरी लक्ष्य भाषा, म्हणजे ज्या भाषेत संदेश पुनर्चिन्हित करायचा आहे ती भाषा. दोन भाषांच्या ज्ञानाबरोबरच भाषांतरकाराला संदेशाचे स्वरूप नीट समजणे आवश्यक असते. मूळ भाषेतील संदेश नेमका कशाविषयी आहे, याचे आकलन त्याला होणे आवश्यक असते."[३] त्यामुळे अशा भाषांतरात केवळ भाषिक ज्ञान पुरेसे नसून, सांस्कृतिक संवेदनशीलता, सर्जनशीलता आणि संदर्भाची जाणीव आवश्यक असते.

(उ) संस्कृतीनिहाय फरक

भाषेतील अनेक शब्द, प्रतीक, रूढी, आणि संदर्भ हे त्या संस्कृतीशी निगडित असतात. दुसऱ्या भाषेत त्यांचे तंतोतंत रूप नसते. भाषांतर करताना भाषेचा अर्थ, भावार्थ आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा समन्वय साधणे हेच सर्वात मोठे कौशल्य आहे. "मूळ लेखकाचे म्हणणे सर्व बाजूंनी नीट समजावून घेऊन आपल्यासाठी, आपल्या वाचकांसाठी त्याचा एक निश्चित अर्थ लावून तो सुसंगतपणे भाषांतरातून व्यक्त होण्यावर भाषांतराचे यश अवलंबून असते. इंग्रजीतून मराठीत भाषांतर करायचे असेल, तर भाषांतरित मराठी हे मराठी वाटले पाहिजे. म्हणजे आपण मुळातून मराठीतूनच वाचतो आहोत, असे वाचकाला वाटले पाहिजे. अर्थातच, असे भाषांतर हे आदर्श भाषांतर होय. मूळ अनुभवाशी पूर्ण प्रामाणिक राहणे आणि मराठी भाषेचे मराठीपण अबाधित ठेवणे, या दोन्ही गोष्टी एकत्र जुळवून आणणे, हे भाषांतरकाराच्या कौशल्यावर अवलंबून असते. कारण प्रत्येक भाषेला त्या प्रदेशाच्या मातीचा गंध असतो, तिथल्या समाजजीवनाशी त्या भाषेचे घट्ट नाते असते, ती भाषा तिथल्या शतकानुशतकांच्या संस्कृतीतून उमललेली असते."[४] भाषांतरकाराने केवळ भाषेतील शब्द नव्हे तर त्या शब्दांच्या भावनांचा, संदर्भांचा आणि संस्कृतीचा अर्थ समजून घेऊन लक्ष्य भाषेत नवा, सजीव अनुभव निर्माण करणे आवश्यक असते.

२. सांस्कृतिक आव्हाने

भाषांतर हा फक्त भाषेचा नव्हे तर संस्कृतींचा संवाद आहे. प्रत्येक भाषा तिच्या समाजाच्या परंपरा, इतिहास, श्रद्धा आणि जीवनपद्धतीने घडते. त्यामुळे काही शब्द, प्रतिमा आणि संकल्पना त्या संस्कृतीपुरतेच मर्यादित असतात. "भाषांतरकाराला मूळ भाषेतील अर्थ वा आशय समजून घ्यावा लागतो आणि लक्ष्य भाषेत तोच अर्थ वा आशय आणावा लागतो."[५]

(अ) संस्कृतिवाचक शब्द

काही संकल्पना एका संस्कृतीत सहज समजतात, परंतु दुसऱ्या भाषेत त्यांचे तंतोतंत रूप नसते.

(आ) स्थळ-काळ संदर्भ

(i) **ऐतिहासिक संदर्भ** -काही शब्द विशिष्ट ऐतिहासिक काळाशी जोडलेले असतात.

(ii) **सामाजिक संदर्भ**-काही संज्ञा सामाजिक पद्धतींशी संबंधित असतात.

(iii)**स्थानिक संदर्भ-** प्रदेश, भूगोल किंवा लोकसाहित्याशी निगडित शब्दांचे भाषांतर करताना स्पष्टीकरण आवश्यक असते.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

(इ) संदर्भासह भाषांतराचे महत्त्व

सांस्कृतिक आव्हानांवर मात करण्यासाठी पुढील तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शब्दाचा अर्थ त्याच्या प्रसंगानुसार समजून घ्यावा. लक्ष्य भाषेत सर्वात जवळचा सांस्कृतिक अर्थ निवडावा. आवश्यक असल्यास थोडक्यात स्पष्टीकरण जोडावे. भाषांतरातील भाषिक आणि सांस्कृतिक आव्हाने हे परस्परावलंबी आहेत. भाषा ही संस्कृतीची अभिव्यक्ती असल्याने, भाषांतर करताना केवळ शब्दांतर न करता भाव, अर्थ, संदर्भ आणि संस्कृतीचा आत्मा जपणे अत्यावश्यक आहे.

३. भावात्मक आणि वैचारिक आव्हाने :

भाषांतर हे केवळ शब्दांचे रूपांतर नसून भाव, विचार, आणि दृष्टिकोनाचा सुसंवाद आहे. त्यामुळे भाषांतर करताना भावनिक व वैचारिक आव्हानांना सामोरे जाणे हे अनिवार्य ठरते. मूळ लेखकाचा हेतू, त्याची भाषाशैली आणि त्या भाषेतील सांस्कृतिक व मानसिक छटा हे सर्व लक्ष्य भाषेत तंतोतंत उतरवणे अत्यंत कठीण कार्य असते.

१. अचूक भावाभिव्यक्तीचे आव्हान

भाषांतरातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे भावांच्या अचूक अभिव्यक्तीचे जतन करणे. काव्य, कादंबरी, आत्मकथा किंवा ललित लेखनात लेखकाचा भावनात्मक आविष्कार सूक्ष्म शब्द, लय, आणि अलंकारांद्वारे प्रकट होतो. मूळ भाषेतील तो भावार्थ, ती नजाकत आणि ती सौंदर्यपूर्ण लय दुसऱ्या भाषेत पुनरुत्पादित करणे हे अत्यंत अवघड असते. अशा वेळी भाषांतरकाराने फक्त शब्द नव्हे, तर त्या शब्दांच्या मागे दडलेले भावविश्व समजून घेणे आणि ते लक्ष्य भाषेच्या सांस्कृतिक व भावनिक चौकटीत पुन्हा उभे करणे आवश्यक ठरते.

२. वैचारिक ग्रंथांतील क्लिष्टतेचे आव्हान

वैचारिक, तात्त्विक किंवा वैज्ञानिक ग्रंथांचे भाषांतर करताना संकल्पनात्मक अचूकता आणि वैचारिक प्रामाणिकता हे दोन मोठे प्रश्न निर्माण होतात. अशा ग्रंथांमध्ये वापरलेली संज्ञा, तात्त्विक चौकट आणि तर्कशुद्ध मांडणी अत्यंत विशिष्ट आणि सूक्ष्म असते. भाषांतरकाराने संदर्भ, तत्त्वज्ञानाची परंपरा, आणि दोन्ही भाषांची अभिव्यक्तीसंवेदना लक्षात घेऊन शब्दांची निवड करणे आवश्यक ठरते.

४. विशिष्ट प्रकारच्या साहित्याच्या भाषांतरात येणारी काही प्रमुख आणि विशेष आव्हाने:

१.साहित्याचे भाषांतर

काव्य, विनोद आणि नाटकातील आव्हाने साहित्याचे भाषांतर हे भाषांतरकलेतील सर्वांत गुंतागुंतीचे आणि संवेदनशील क्षेत्र मानले जाते. कारण साहित्य म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नसून भाव, लय, संस्कृती आणि कल्पनाशक्तीचे सर्जनशील विश्व आहे. त्यामुळे गद्य, काव्य, विनोदी साहित्य किंवा नाट्यरूप साहित्याचे भाषांतर करताना भाषांतरकाराने केवळ अर्थ नव्हे, तर मूळ सर्जनातील आत्मा, लय, आणि सौंदर्य जपणे आवश्यक ठरते. या संदर्भात खालील आव्हाने अत्यंत महत्त्वाची आहेत.

१. काव्याचे भाषांतर आणि त्यातील लय-सौंदर्याचे आव्हान :काव्याचे भाषांतर हे सर्व प्रकारच्या भाषांतरांपेक्षा सर्वाधिक सूक्ष्म आणि कठीण मानले

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

जाते. कारण काव्य हे भाव, लय, छंद, आणि शब्दसौंदर्याचे सर्जनशील मिश्रण असते.

(अ) लय आणि छंद

प्रत्येक भाषेची स्वतःची उच्चारपद्धती, मात्रा, आणि संगीतात्मक रचना असते. मूळ कवितेतील छंद आणि ताल जपताना अनेकदा अर्थाचा थोडा फेरबदल करावा लागतो, अन्यथा कविता कृत्रिम वाटते.

(आ) यमक आणि अनुप्रास

कवितेतील यमक आणि अनुप्रास जपणे म्हणजे दोन्ही भाषांच्या ध्वनिसंवेदनांमध्ये संतुलन साधणे.

भाषांतरकाराला कधी शब्दांची लय जपावी लागते, तर कधी भावार्थाला प्राधान्य द्यावे लागते.

२. विनोद आणि उपहासातील सांस्कृतिक आव्हाने

विनोद, उपहास आणि व्यंग ही साहित्याची ती रूपे आहेत जी सांस्कृतिक संदर्भांशी घट्ट जोडलेली असतात. एका संस्कृतीतील विनोद दुसऱ्या संस्कृतीत तितकाच अर्थपूर्ण किंवा मनोरंजक वाटेलच असे नाही. विनोद आणि उपरोधातील सूक्ष्म भावार्थ जपण्यासाठी भाषांतरकाराने सांस्कृतिक पार्श्वभूमी, सामाजिक मानसिकता आणि संदर्भांचा अर्थपूर्ण अनुवाद करणे आवश्यक असते. काही वेळा थेट भाषांतर न करता स्थानिक अनुकूल रूपांतरण करावे लागते.

३. नाटकांचे भाषांतर आणि अभिनयात्मक रूपांतर

नाटकाचे भाषांतर हे इतर कोणत्याही साहित्यप्रकारापेक्षा वेगळे असते. कारण नाटक हे वाचण्यासाठी नव्हे, तर सादर करण्यासाठी लिहिलेले असते. त्यामुळे त्याचे भाषांतर करताना फक्त शब्दार्थ जपणे पुरेसे नसून, ते संवाद बोलताना नैसर्गिक वाटतील याची काळजी घ्यावी लागते.

(अ) संवादांचे रूपांतर:

मूळ भाषेतील संवाद अनेकदा त्या समाजाच्या वक्तृत्वशैली, बोलीभाषा, आणि सामाजिक संदर्भांशी निगडित असतात. ते तंतोतंत दुसऱ्या भाषेत उतरवले, तर ते कृत्रिम वाटतात.

(आ) अभिनय आणि रंगमंचीय मांडणी:

नाटकाचे भाषांतर करताना मंचावरच्या अभिनयशैली, देहबोली, आणि प्रेक्षकांचा सांस्कृतिक संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. इंग्रजी नाटकातील औपचारिक संभाषण मराठी रंगमंचावर विनोदी वाटू शकते; म्हणून संवादांचे स्थानिकीकरण आवश्यक ठरते.

साहित्यिक भाषांतराचे महत्त्व :

साहित्यिक भाषांतर हे केवळ भाषिक काम नसून ते संस्कृती, विचार आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीचे साधन आहे. यामुळे एका समाजातील अनुभव दुसऱ्या समाजापर्यंत पोहोचतात आणि मानवतेचा सामूहिक सांस्कृतिक वारसा निर्माण होतो. "एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे अनेकजणांपर्यंत पोहोचणार असते आणि कायमची उपलब्ध

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

राहणार असते. याशिवाय, भाषांतरामुळे पुनर्निर्मितीचा आनंद मिळतो तो वेगळाच! माहितीपर किंवा विज्ञानक्षेत्रातील भाषांतरे करणे व साहित्यकृतीची भाषांतरे करणे, यात फार मोठा फरक आहे. माहितीपर भाषांतरामध्ये वस्तुनिष्ठ आणि सुबोध असे भाषांतर करण्याला महत्त्व आहे. मात्र साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक परिस्थितीचा, ऐतिहासिक काळाचा, परकीय भाषेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे, त्या भाषेची उपजत समज आणि अभ्यासपूर्ण ज्ञान असावे लागते."[६] साहित्यिक भाषांतराचे महत्त्वाचे पैलू पुढील प्रमाणे आहेत.

१.संस्कृतींची देवाणघेवाण : भाषांतरामुळे विविध समाज, धर्म, प्रांत आणि संस्कृती यांमधील समज वाढते. उदा. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली'चे इंग्रजी भाषांतर केल्यावर त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला आणि भारतीय साहित्य जागतिक पातळीवर पोहोचले.

२.विचारांची देवाणघेवाण : टॉल्स्टॉय, दोस्तोएव्हस्की, गटे, शेक्सपियर, होमर यांचे साहित्य भाषांतरामुळे जगभर पोहोचले आणि त्यातून मानवी विचारविश्व समृद्ध झाले.

३.सांस्कृतिक समृद्धी : भाषांतरामुळे नवीन शब्द, शैली आणि साहित्यिक पद्धती आपल्या भाषेत येतात. उदा. इंग्रजी आणि फ्रेंच साहित्याच्या प्रभावामुळे मराठी कादंबरी आणि नाट्यप्रकार अधिक विकसित झाले.

४.सामाजिक आणि बौद्धिक संवाद : साहित्यिक भाषांतरामुळे जगभरातील लेखक आणि वाचक मानवी अनुभवांच्या सामायिक मंचावर येतात.

५.राष्ट्रीय आणि प्रादेशिक साहित्याची ओळख: भारतीय भाषांतील साहित्य जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी भाषांतर अत्यंत आवश्यक आहे. उदा. दलित साहित्य, स्त्री साहित्य आणि लोकसाहित्य हे भाषांतरामुळे जागतिक वाचकांपर्यंत पोहोचले आहे.

भाषांतरकाराचे कार्य आणि जबाबदारी :

साहित्यिक भाषांतरकार हा लेखकाचा सहनिर्माता असतो. त्याला दोन्ही भाषांचा गाढा अभ्यास, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि साहित्यिक दृष्टिकोन आवश्यक असतो. "भाषांतराच्या मूल्यमापनाची प्रक्रिया ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. मजकूर कोणत्या प्रकारचा आहे व तो कशासाठी भाषांतरित केला जात आहे, यावर भाषांतराच्या मूल्यमापनाचे निकष अवलंबून राहतील. गद्य मजकुराच्या बाबतीत वा नेहमीच्या व्यावहारिक भाषिक उपयोजनाच्या बाबतीत भाषांतरामध्ये वाच्यार्थाला प्राधान्य असेल व त्याच्याशी इमान राखणे हे तत्त्व भाषांतरकाराला डोळ्यासमोर ठेवावे लागेल."[७] मूळ लेखकाच्या आशयाशी निष्ठावान राहणे, परंतु शब्दशः भाषांतर न करता भावार्थ आणि लय जपणे आणि लक्ष्य भाषेतील वाचकाच्या संवेदनांना अनुरूप स्वरूप देणे. ही त्याची जबाबदारी असते. म्हणजेच प्रत्येक भाषांतर हे दोन संस्कृतींमधील संवादाचे रूप असते.

साहित्याचे भाषांतर म्हणजे भाषेच्या सीमांना ओलांडून संस्कृती, विचार आणि भावनांना एकत्र आणणारा पूल. "एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर"[८] होय. हे कार्य अत्यंत जबाबदारीचे आणि सर्जनशीलतेची कसोटी पाहणारे असते. भाषांतरकाराने

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

केवळ शब्द नव्हे तर मानवी अनुभवाचा आत्मा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेला, तरच ते भाषांतर यशस्वी ठरते.

संदर्भ टीपा:

१. *सुगम मराठी व्याकरण व लेखन , मो रा वाळिंबे , नितीन, पुणे (पंच्चावनावी सु आ), २०२० पृ . ३९६*

२. *मराठी वाङ्मय कोश खंड -४ समीक्षा संज्ञा, संपा. विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती , मुंबई, २००२, पृ २४६*

३. *आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, मिलिंद मालशे , लोकवाङ्मय गृह, मुंबई, (तृ आ)पृ. ११९*

४. *सुगम मराठी व्याकरण व लेखन, उ. नि . पृ ३९६*

५. *आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, उ नि पृ. १२०*

६. *सुगम मराठी व्याकरण व लेखन, उ. नि . , पृ ३९६*

७. *आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, उ. नि., पृ . पृ.१२५*

८. *भाषांतर, सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. १*

Cite This Article:

प्रो. डॉ. चव्हाण प्र. (2025). *भाषांतरातील आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 5–11).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भाषांतरातील आव्हाने

* डॉ. सुमित बबन साळुंखे

* संशोधक विद्यार्थी.

सारांश :

भाषांतराच्या संदर्भात विचार करता करताना भाषांतर ही संकल्पाना वेगवेगळ्या क्षेत्रात वापरली जाते. मराठी साहित्यात भाषांतराची परंपरा संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषेतील साहित्याद्वारे निर्माण झाली. आधुनिकीकरणाच्या काळामध्ये भाषांतर हे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रानुसार भाषांतरात बदल होत असतो. त्याचबरोबर मूळ संहिता एका भाषेतून दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे म्हणजे भाषांतर होय. त्या संहितेचा आशय, अभिव्यक्ती, भावनिकता, सामाजिकीकरणात होणारा अर्थ, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिपेक्ष्य भाषांतरकारला तपासावे लागते. नुसते वरवरचे भाषांतर करून तो घटक दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे म्हणजे भाषांतर नव्हे. त्यासाठी वरील घटकाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. असे असले तरी ते काम आव्हानात्मक आहे.

साहित्य क्षेत्रात भाषांतर संकल्पना खूप व्यापक स्वरूपाची मानली जाते. साहित्याच्या भाषांतरामुळे वेगवेगळ्या भाषेतील संस्कृती, सामाजिक, राजकीय व भौगोलिक परिस्थिती आढावा घेता येतो. तसेच संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण होण्यासाठी भाषांतर महत्त्वाचे ठरते. भाषांतरामुळे साहित्याला एक राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय दर्जा मिळण्यास मदत होते. त्याची व्यापकता त्या भाषेपूर्ती मर्यादित न राहता इतर भाषेतून ती साहित्यकृती भाषांतराच्या स्वरूपात प्रकाशित होणे म्हणजेच त्या साहित्यकृतीचे राष्ट्रीयकरण होणे. मात्र भाषांतर करताना त्या साहित्यकृतीचे सत्त्व हरवता कामा नये, याचे भान भाषंतरकारला ठेवावे लागते.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

भाषांतर संकल्पना :

भाषांतर संकल्पना समजून घेत असताना, भाषांतर म्हणजे नेमकं काय? भाषांतराचा अर्थ पहाताना भाषांतराला इंग्रजीतील 'ट्रान्स्लेशन' शब्दाचा पर्याय आहे. आणि इंग्रजी शब्दाचे मूळ लॅटिनमध्ये आहे. 'ट्रान्स' म्हणजे पलीकडे अथवा दुसरीकडे आणि 'लेटम्' म्हणजे घेऊन जाणे मूलतः या शब्दाचा अर्थ स्थलांतर असा आहे. आणि 'दुसरीकडे घेऊन जाणे' या वाच्यार्थाचा कालांतराने लाक्षणिक अर्थ रूढ झाला आणि 'एका भाषेत व्यक्त झालेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याच्या प्रक्रिये'साठी त्याचे उपयोजन होऊ लागले. 'ट्रान्स्लेशन' संज्ञा वापरली जाते. या संदर्भात अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. या संदर्भात सदा कऱ्हाडे म्हणतात, "भाषांतर म्हणजे एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे."१ एका भाषेतील व्यक्त

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

केलेले विचार भाषेत व्यक्त करणे अशी त्यांनी केलेली व्याख्या समर्पक आहे. या संदर्भात टॉमस् बेस्ट् जर्विसच्या म्हणतो, "but then everyone has his particular style both of composition and translation, and it is natural that we should all prefer our own."[२] मूळ रचनेत लेखकाची स्वतःची शैली असते तशी भाषांतरात भाषांतरकाराचीही स्वतःची शैली असते. पुढे सदा कऱ्हाडे म्हणतात, "एका भाषेच्या अंतर्गत व्यवस्थेच्या जागी दुसऱ्या भाषेच्या अंतर्गत व्यवस्थेची प्रस्थापना करणे म्हणजे भाषांतर. संक्षिप्त रूपात सांगायचे तर, भाषांतर म्हणजे चिन्हांतर अथवा प्रतीकांतर"[३] अशी भाषेच्या अंतर्गत व्यास्थेच्या संदर्भात व्याख्या केली आहे. मराठी विश्वकोशात भाषांतरा संदर्भात अनघा भट- बेहरे म्हणतात, "ज्यामध्ये एका भाषेमध्ये निर्मिलेल्या संहितेचा ग्रहणकर्ता दुसऱ्या भाषेमध्ये त्याच आशयाच्या संहितेची पुनर्निर्मिती करतो व संप्रेषण पूर्ण करतो. थोडक्यात, म्हणजे एका भाषेच्या सहाय्याने निर्माण झालेल्या आशयाची पुनरावृत्ती दुसऱ्या भाषेत करणे याला भाषांतर म्हणता येईल. संप्रेषण ज्या भाषेमध्ये होते. त्यातील भाषिक द्रव्य, जसे शब्द, रूप, वाक्यरचना इत्यादी, यांच्या साहाय्याने संप्रेषणाचे प्रयोजन व अर्थ निश्चित करणे व ज्या भाषेत संप्रेषणाची पुनरावृत्ती करायची असेल तिच्यातील समकक्ष पर्यायांचे उपयोजन करून तोच आशय पुनरावृत्त करणे असे भाषांतराचे स्वरूप असते. मूळ संहिता बाजूला काढून भाषांतराचा विचार करता येत नाही. मूळ संहितेचा आशय थोडक्यात कथन करणे म्हणजे भाषांतर नव्हे. भाषांतरालाच मराठीमध्ये 'अनुवाद' ही पर्यायी संज्ञा वापरण्यात येते. भाषांतराचे स्वरूप लिखित किंवा मौखिक अशा दोनही प्रकारचे असू शकते."[४] पुढे कऱ्हाडे म्हणतात, "एका भाषेतील अभिव्यक्त अर्थ ज्या प्रतीक व्यवस्थेतून म्हणजे शब्दचिन्ह व्यवस्थेतून व्यक्त झाला, त्या प्रतीक व्यवस्थेऐवजी दुसऱ्या भाषेतील तोच अर्थ व्यक्त करणारी प्रतीक व्यवस्था योजणे म्हणजे भाषांतर करणे"[५] अशा प्रकारे भाषांतरासा अनुवाद ही पर्यायी संज्ञा वापरली जाते या संदर्भात संबंध में डुबॉयस (1972) के विचारों को देखा जा सकता है "अनुवाद किसी दूसरी भाषा (लक्ष्य भाषा) में की गई वह अभिव्यक्ति है जो पहले ही किसी भाषा (स्रोत भाषा) में की जा चुकी है और जिसमें मूल के अर्थ और शैली की समतुल्यता को सुरक्षित रखा जाता है।"[६] अशी व्याख्या डुबॉयस यांनी केले केली आहे.

असे असले तरी भाषांतराचे विवेध प्रकार आढळतात. आशय, शब्दशः भाषांतर, मुक्त भाषांतर, साहित्यिक भाषांतर, प्रमाणित भाषांतर, तांत्रिक भाषांतर, यांत्रिक भाषांतर असे त्याचे एकून प्रकार सांगता येतील. तसेच भाषांतर विविध क्षत्रे सांगता येतील या मध्ये राजकीय पक्षाचे कार्याचा, कार्यालयीन व्यवहार, प्रसारमाध्यमे, सिनेमे, साहित्य, विज्ञान तंत्रज्ञान, कायदे, वाणिज्य व्यवहार, वैद्यक क्षेत्र, ध्वनिचित्रफीत भाषांतरण इ. क्षत्रे सांगता येतील. भाषांतर करताना भाषांतरातील आव्हाने कोणती ते पाहुत.

भाषांतरातील आव्हाने :

भाषांतर खूप व्यापक आणि अभ्यासपूर्ण प्रक्रिया आहे. ज्यामध्ये दोन भाषांचा सखोल अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. आपण एखादी साहित्यकृती ज्या भाषेमध्ये भाषांतर करणार आहे, त्या भाषेचे सखोल ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. त्या भाषेबरोबरच त्या भाषेतील सांस्कृतिक, सामाजिक,

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

भौगोलिक संदर्भ, तसेच म्हणी उखाणे वाक्यप्रचार आणि व्याकरण यांचाही भाषांतरकाराचा अभ्यास असणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा त्या भाषांतराचा आशयाचा अर्थ, अभिव्यक्तीचा अर्थ बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे भाषांतर करत असताना भाषांतरकराला वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये काही सांस्कृतिक आव्हाने व भाषिक आव्हाने असे दोन विभाग करता येतील. सांस्कृतिक आव्हानामध्ये भाषेची सांस्कृतिक विशिष्टता, वाक्यप्रचार व म्हणी यांचे सांस्कृतिक संदर्भ, विनोद व उपासनेचे सांस्कृतिक संदर्भ, सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ, प्रादेशिक भौगोलिक, धार्मिक व नैतिक मूल्यांचे संदर्भ, जात, वर्ण लिंग या संदर्भातील संदर्भ , त्याचबरोबर भाषिक आव्हाने शब्दसंग्रहाची मर्यादा, वाक्प्रचार व म्हणी, अनेकार्थता, शैली, व्याकरण, बोलीभाषा इत्यादी आव्हाने सांगता येतील. या आव्हानांच्या संदर्भातील विस्तृत विवेचन. भाषांतर प्रक्रियेमध्ये सांस्कृतिक आव्हाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, कारण भाषा आणि संस्कृती एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. केवळ शब्दांचे भाषांतर पुरेसे नसते, तर त्या शब्दांमागे असलेले सांस्कृतिक संदर्भ, भावना, आशय आणि सूक्ष्म अर्थ अचूकपणे पोहोचवणे हे खरे आव्हान असते.

१. **संस्कृती आणि संज्ञा :** भाषांतरकाने केवळ दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवून चालणार नाही, तर दोन्ही संस्कृतींची सखोल माहिती असणे आवश्यक आहे. प्रेक्षकांच्या स्थानिक चालीरीती, परंपरा आणि समजुतींनुसार मजकूर अनुकूलित करणे महत्त्वाचे आहे. भाषांतरातील सर्वात मोठे आव्हान आहे. काही वस्तू, संकल्पना किंवा प्रथा केवळ एका विशिष्ट संस्कृतीत आढळतात. त्यांना भाषांतर करणाऱ्या भाषेत थेट प्रतिशब्द नसतो. उदा: भारतीय संस्कृतीतील 'आरती', 'प्रसाद' किंवा 'रक्षाबंधन' यांसारख्या शब्दांना इंग्रजी किंवा इतर युरोपीय भाषांमध्ये थेट भाषिक समकक्ष शब्द नाहीत. अशा वेळी, अनुवादकाला वर्णनात्मक भाषांतर किंवा स्थानिक संज्ञा तशीच ठेवून तळटीपेत स्पष्टीकरण द्यावे लागते.

२. **वाक्प्रचार व म्हणी :** वाक्प्रचार हे भाषेचे सौंदर्य असतात, परंतु ते अनेकदा संस्कृतीवर आधारित असतात. त्यांचा शब्दशः अर्थ घेतल्यास मूळ अर्थ पूर्णपणे बदलून जातो. सामाजिक भाषेत त्यांचा अर्थ वेगळा होतो, याकडे भाषांतरकाराला लक्ष द्यावे लागते. उदा: मराठीतील वाक्प्रचार 'हातभार लावणे', 'रस असणे' आणि "करावे तसे भरावे" किंवा " अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ" या म्हणींचा उद्देश आणि प्रभाव टिकवण्यासाठी लक्ष्यित भाषेत त्याच अर्थाचा एखादा स्थानिक वाक्प्रचार शोधावा लागतो. त्यामुळे भाषंतरकारापुढे हे आव्हान आहे.

३. **सामाजिक,धार्मिक मूल्ये :** प्रत्येक समाजाची स्वतःची मूल्ये आणि श्रद्धा असतात. भाषांतर करताना या मुद्द्यांवर संवेदनशील असणे गरजेचे आहे. धार्मिक आणि पौराणिक संदर्भांनी भरलेल्या संज्ञांचे भाषांतर करताना त्यांची मूळ अर्थपूर्ण खोली जपण्याचे आव्हान असते. काहीवेळा, एका संस्कृतीतील सामान्य शब्द दुसऱ्या संस्कृतीत अपमानास्पद किंवा निषिद्ध मानला

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

जाऊ शकतो. त्यामुळे त्याला सामजिक आणि धार्मिक मुद्यावर भाषांतर करणे हे आव्हान आहे.

४. **औपचारिकता- आदर :** जपानी किंवा कोरियन संभाषणात औपचारिकता आणि आदर दर्शवण्यासाठी वेगवेगळे शब्द किंवा व्याकरणिक रचना असतात, ज्या इतर भाषांमध्ये उदा. इंग्रजी तशाच पद्धतीने व्यक्त करणे कठीण असते. दैवी नावे आणि धार्मिक संज्ञा: धार्मिक आणि पौराणिक संदर्भांनी भरलेल्या संज्ञांचे भाषांतर करताना त्यांची मूळ अर्थपूर्ण खोली आणि प्रतीकात्मकता जपण्याचे आव्हान असते काही भाषांमध्ये उदा. हिंदी, मराठी - 'तू', 'तुम्ही', 'आपण' आदर व्यक्त करण्यासाठी वेगवेगळे सर्वनाम किंवा क्रियापदाची रूपे वापरली जातात. इंग्रजीसारख्या भाषांमध्ये 'You' हा एकच शब्द असल्याने, भाषांतरात योग्य औपचारिकता आणि आदरभाव टिकवणे आव्हानात्मक असते.

५. **विनोद-भावना :** विनोदाचे स्वरूप अनेकदा सांस्कृतिक असते. एका संस्कृतीतील विनोद दुसऱ्या संस्कृतीतील लोकांना समजेलच असे नाही, कारण तो विशिष्ट सामाजिक किंवा राजकीय संदर्भांवर आधारित असू शकतो. तसेच, भावना व्यक्त करण्याच्या पद्धतीही संस्कृतीनुसार बदलतात. हे आव्हानात्मक आहे.

६. **भाषिक सापेक्षतावाद :** हा सिद्धांत सांगतो की, आपण ज्या भाषेत विचार करतो, ती भाषा आपल्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर परिणाम करते. इंग्रजीमध्ये 'Time' वेळ हा मोजता येण्याजोगा किंवा खर्च करता येण्याजोगा Spend time, Waste time मानला जातो, तर इतर काही संस्कृतींमध्ये वेळ ही एक चक्रीय संकल्पना Cyclical Concept असू शकते. भाषांतर करताना वेळेबद्दलचा हा मूलभूत दृष्टिकोन बदलल्यास अर्थाचा अनर्थ होऊ शकतो.

७. **सांकेतिक संवाद :** संवाद केवळ शब्दांनीच होत नाही. शरीराची हालचालीची भाषा, हावभाव, नजरेचा संपर्क आणि अगदी शांतता बाळगणे हे प्रत्येक संस्कृतीत वेगळे अर्थ दर्शवते. काही संस्कृतींमध्ये थेट नजरेला नजर देऊन बोलणे हे प्रामाणिकपणाचे लक्षण मानले जाते, तर आशियाई संस्कृतीतील काही भागांमध्ये तो अनादर समजला जाऊ शकतो. चित्रपट किंवा नाट्यमय साहित्याचे भाषांतर करताना हे सांकेतिक संदर्भ जपणे महत्त्वाचे ठरते.

८. **राजकीय, ऐतिहासिक संदर्भ**: काही शब्द किंवा वाक्ये विशिष्ट ऐतिहासिक किंवा राजकीय घटनांशी जोडलेली असतात. त्यांचा योग्य संदर्भ लावणे महत्त्वाचे असते.उदा: एखादा शब्द एका देशासाठी अभिमानास्पद असू शकतो, तर दुसऱ्या देशासाठी वेदनादायक किंवा अपमानास्पद असू शकतो उदा. वसाहतवादाशी संबंधित शब्द भाषांतर करताना या संवेदनशीलतेचा विचार करणे गरजेचे असते, अन्यथा राजकीय वाद निर्माण होऊ शकतात.

९. **भाषिक आणि गैर-भाषिक चिन्हे** : भाषेमध्ये केवळ शब्दच नव्हे, इतर गैर-भाषिक चिन्हे उदा. रंगांचे महत्त्व यांचाही समावेश होतो. उदा: पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये 'पांढरा' रंग शांततेचे प्रतीक मानला जातो, तर भारतीय संस्कृतीमध्ये तो अनेकदा दुःखाचे किंवा वैराग्याचे

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

प्रतीक मानला जातो. भाषांतर करताना मजकुराच्या मूळ उद्देशानुसार या चिन्हांचा योग्य अर्थ लावणे आवश्यक असते.

१०. **खाद्यपदार्थ, भौगोलिक संदर्भ** : हे घटक विशिष्ट प्रदेशाशी आणि काळाशी जोडलेले असतात.उदा: 'मिसळ' किंवा 'पुरणपोळी' सारख्या खाद्यपदार्थांचे भाषांतर करताना, केवळ शब्दाचा अनुवाद पुरेसा नसतो, तर त्या पदार्थाचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करावे लागते. ऐतिहासिक घटना किंवा भौगोलिक ठिकाणांचे संदर्भ वाचकाला समजण्यासाठी तळटीपा किंवा स्पष्टीकरणात्मक भाषांतर वापरावे लागते.

११. **बोलीभाषा आणि प्रादेशिक विविधता :** एकाच भाषेच्या वेगवेगळ्या बोलीभाषांमध्ये सांस्कृतिक बारकावे असतात. उदा: मराठी भाषेतील वऱ्हाडी, अहिराणी किंवा कोकणी बोलींचे भाषांतर करताना, मूळ भाषेतील प्रादेशिक रंगत आणि विशिष्ट संदर्भ टिकवणे हे एक मोठे आव्हान असते.

१२. **व्याकरणिक आणि वाक्यरचनेतील फरक** : प्रत्येक भाषेचे स्वतःचे नियम आणि वाक्यरचना असते. एका भाषेतील रचना दुसऱ्या भाषेत थेट वापरता येत नाही. शब्दक्रम इंग्रजीसारख्या भाषांमध्ये सामान्यतः 'कर्ता-क्रियापद-कर्म' Subject-Verb-Object – SVO हा क्रम असतो. मराठीमध्ये 'कर्ता-कर्म-क्रियापद' Subject-Object-Verb - SOV हा क्रम असतो. उदा. "मी आंबा खातो" (I mango eat) याचे इंग्रजी भाषांतर "I eat mango" असे होते. हा क्रम बदलणे आवश्यक असते.

१३. **लिंग- वचन :** अनेक भाषांमध्ये व्याकरणात लिंगभेद पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग महत्त्वाचे असतात, जे इतर भाषांमध्ये इंग्रजी तसे नसतात. मराठीत वस्तूंचे लिंग बदलते, जे भाषांतर करताना अचूकपणे वापरणे आव्हानात्मक असते. काळाचे स्वरूप काही भाषांमध्ये काळाचे आणि कार्याचे स्वरूप दर्शवण्यासाठी अत्यंत गुंतागुंतीच्या क्रियापद रचना असतात, ज्या इतर भाषांमध्ये एकाच शब्दात व्यक्त केल्या जाऊ शकतात.

१४. **शब्दसंग्रह आणि अर्थविषयक समस्या** : शब्दांचे अर्थ संदर्भानुसार आणि वापरानुसार बदलतात, ज्यामुळे भाषांतरात गुंतागुंत निर्माण होते. बहुअर्थी शब्द एकाच शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात. संदर्भानुसार योग्य अर्थ निवडणे अनुवादकासाठी आव्हानात्मक असते. इंग्रजीतील "bank" नदीकाठ किंवा बँक या शब्दाचा अर्थ वाक्यातील संदर्भानुसार ठरवावा लागतो. समानार्थी शब्दांचा अभाव काही शब्दांसाठी लक्ष्यित भाषेत थेट प्रतिशब्द नसतात. उदा. काही विशिष्ट तांत्रिक संज्ञा किंवा भावनिक छटा दर्शवणारे शब्द. अशा वेळी, अनुवादकाला वर्णनात्मक भाषांतर करावे लागते किंवा मूळ शब्द तसाच ठेवून स्पष्टीकरण द्यावे लागते.मिश्र शब्द दोन किंवा अधिक शब्दांपासून बनलेल्या मिश्र शब्दांचे भाषांतर करताना योग्य अर्थ लावणे कठीण असते.

१५. **शैली- टोन** : मजकुराची शैली औपचारिक, अनौपचारिक, तांत्रिक, साहित्यिक आणि टोन विनोदी, गंभीर, उपहासात्मक भाषांतरात टिकवून ठेवणे महत्त्वाचे असते. नोंदणी तांत्रिक किंवा कायदेशीर कागदपत्रांची

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषा अत्यंत औपचारिक आणि अचूक असणे आवश्यक असते, तर साहित्याचे भाषांतर अधिक सर्जनशील असू शकते. शैलीतील हा फरक ओळखणे आणि त्यानुसार भाषांतर करणे आवश्यक असते. हे आव्हान आजकालच्या भाषांतरकारला पेलून भाषांतर करावे लागते.

भाषांतर करत असताना भाषांतरकाराला भाषा, साहित्य, संस्कृती, व्याकरण, शब्दांचा अर्थ, शब्दसंग्रह, म्हणी. वाक्प्रचार, त्याच्या प्रदेशानुसार वापरणारे भाषिक शब्द, बोलीभाषेतील शब्द यांचा सखोल अभ्यास असावा लागतो. या सर्व घटकाचा वापर भाषांतर करताना भाषांतरकाराला अचूकपणे करावा लागतो. ऐतिहासिक, सामाजिक घटनांचे भाषांतर करत असताना काळजीपूर्वक करावा लागतो. त्या काळातील घटनांचा उल्लेख त्या आशयानुसार भाषांतरकाराला करावा लागतो. भाषांतर ही प्रक्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कशापद्धतीने उपयोगात येते, त्यातले बारकावे अचूकता आपण पाहिली आहे. तसेच डिजिटल युगामध्ये भाषांतराची वेगवेगळी साधने उपलब्ध आहेत. असे असले तरीही भाषांतर करताना भाषांतरकारासमोर वरील आव्हाने आहेत.

संदर्भ ग्रंथ :

१) कऱ्हाडे सदा, 'भाषांतर', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, प्र.आ वर्ष २००७, पृ. ४

२) कुलकर्णी. कृ. भि., 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती', स्व प्रकाशन, पृ. २५

३) उनि, 'भाषांतर' पृ. ७

४) https://marathivishwakosh.org/26845/

५) उनि, 'भाषांतर' पृ.९

६) सिंह दिलीप, 'अनुवाद की व्यापक संकल्पाना', वाणी प्रकाशन, दिल्ली, प्र.आ. वर्ष २०१३, पृ.२

Cite This Article:

डॉ. साळुंखे सु. ब. (2025). भाषांतरातील आव्हाने. **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 12–17).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भाषांतर आणि जाहिरातलेखन

* डॉ. अतुल नारायण चौरे

* सहाय्यक प्राध्यापक , एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८

प्रास्ताविकः

साहित्य हे भाषांतराचे फार व्यापक क्षेत्र आहे. साहित्य आणि समाज यांच्यात अतुट नाते असते. Art is product of environment किंवा Literature is mirror of society असे आपण शिकत असतो. प्रत्येक समाजाची भाषा वेगळी असते. त्याचप्रमाणे प्रत्येक समाज हा विशिष्ट संस्कृतीनीही बांधलेला असतो. जेव्हा समाजाचे चित्रण हे साहित्यात येते तेव्हा साहजिकच संस्कृतीचे चित्रण देखील साहित्यात आपोआपच येत असते. भाषांतराचा विचार करताना भाषेतील सांस्कृतिक संदर्भ जाणून घेणे आवश्यक असते. भाषा हा सांस्कृतिक व्यवहार नसून संस्कृती हा भाषिक व्यवहार आहे असे मत मानुन लेखक अथवा भाषांतरकार हे दोन कृती मधल परस्पर संबंधाचे जनक नसून निमित्त असतात. भाषांतराचा विचार करताना साहित्य समाज संस्कृती हया घटकाचा विचार करावा लागतो. कारण साहित्य फक्त भाषेतच नसते तर ते भाषेचे पण असते. याचा सरळ-सरळ अर्थ शब्दाला शब्द आणि वाक्याला वाक्य जुळवून साहित्य निर्मिती होत नाही. तर भाषेची संपूर्ण संस्कृती साकल्याने त्या भाषेमध्ये प्रतिबिंबित होत असते. या संस्कृतीचा परिचित अनुभव साहित्यकृतीच्या माध्यमातून वाचक घेत असतो. ज्यावेळी अशा सांस्कृतिक देवाण-घेवाणीची गरज भासते त्या-त्या वेळी भाषांतरे केली जातात. बऱ्याच वेळा मानवता, विश्वात्मक सत्य यांचया कसोटीची वेळ येते तेव्हा पण भाषांतरे होतात. अर्थात याचा अर्थ असा अजिबात नाही की सार्वत्रिक किंवा सामुदायिक गरजेतून भाषांतरे होतात. भाषांतरे स्वयंप्रेरित सुध्दा असतात. एखाद्याला एखादी कलाकृती आवडली तर ती इतरापर्यंत पोहोचविण्याची आणि त्या निमित्ताने जे वेड मनाला लागले ते तुजलाही लागले का? या उद्देशाने आणि जमलेच तर यशसे अर्थकृतेच्या उद्देशानेही भाषांतरे होत असतात. चतुर शब्दानुशासन किंवा शब्दप्रभुत्व दुसऱ्या बाजूला यामुळे साहित्य सृजनमागच्या प्रेरणा सृजनप्रक्रिया सृजनाचे परिणाम या सर्वाबरोबर सृजनाचे साधन, भाषा भाषिक सदर्भ, भाषिक वातावरण इत्यादी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

बाबींचा विचार जसा मूळ भाषेच्या लेखकाला करावा लागतो तसाच भाषांतरकाराल पण करावा लागतो.

प्रत्येक साहित्यकृतीचा एक अर्थ असतो. एक फळ असते, एक रस असतो, एक कार्य असते आणि या सगळयांचा एकत्रित निर्वाह पण साहित्यकृतीतून होत असतो.

संदर्भसूची :

१) मराठी - अभ्यासपत्रिका क्र. ९, भाषांतर, रूपांतर, अनुवाद व वाड्.मयीन निबंध लेखक धनाजी गुरव. प्रकाशक - प्राध्यापक – नि.संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई ९८, पृ.क्र. १४, १५, १६,

२) 'भाषांतरमीमांसा' – संपादन डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण – प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९७.

३) 'मराठी वाड्मयाचा इतिहास'- प्रा. रा. श्री. जोग, संपादन महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दुसरी आवृत्ती – १९७३.

४) 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका' – ग.बा. सरदार, - द्वितीय आवृत्ती – १९७७.

५) 'आधुनिक मराठी वाड्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी'- गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस- १९९४.

Cite This Article:

प्रा. डॉ. लांडे एस. डी. (2025). भाषांतर आणि सांस्कृतिक समस्या. **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 108–113).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व

** डॉ. वसंत यशवंत गावडे*

** सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभागप्रमुख, अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय, ओतूर , तालुका: जुन्नर, जिल्हा: पुणे.*

सारांश (Abstract):

आजचे जग हे माहिती तंत्रज्ञानाने परिपूर्ण झालेले जग आहे. या डिजिटल युगात माहिती, ज्ञान आणि विचारांची देवाणघेवाण अतिशय वेगाने होत आहे. अशा परिस्थितीत भाषांतर हा संवादाचा एक महत्त्वाचा दुवा ठरतो. डिजिटल माध्यमांच्या प्रसारामुळे भाषांतराचा व्याप्ती, वेग आणि स्वरूप या तिन्ही गोष्टींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. संगणकीय भाषांतर (Machine Translation), कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), न्युरल नेटवर्क मॉडेल्स (Neural Models) आणि ऑनलाइन साधने (जसे Google Translate, DeepL, ChatGPT इ.) यामुळे भाषांतर आता केवळ विद्वान किंवा व्यावसायिकांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य वापरकर्त्यांच्या हातात पोहोचले आहे. पूर्वी भाषांतर ही केवळ एक मानवी कलात्मक आणि विद्वत्तापूर्ण प्रक्रिया होती; परंतु आज डिजिटल युगात विविध ऑनलाइन साधनांच्या मदतीने भाषांतर क्षेत्रात प्रचंड वेग व व्याप वाढला आहे.

या संशोधन निबंधात डिजिटल युगात भाषांतराचे बदलते रूप, त्याचे सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व, नव्या तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या संधी आणि आव्हाने, तसेच मानवी व तांत्रिक समन्वयाची आवश्यकता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रस्तुत संशोधन निबंधात डिजिटल युगात भाषांतराचे बदलते रूप, नव्या तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेली संधी आणि आव्हाने, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक परिणामांचा सखोल आढावा घेतला आहे.

महत्त्वाचे शब्द (keywords): *डिजिटल युग, संगणकीय भाषांतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन साधने, मशीन ट्रान्सलेशन, न्युरल नेटवर्क मॉडेल्स इत्यादी.*

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रास्ताविक (Introduction) :

भाषा ही मानवाच्या अभिव्यक्तीचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. **(O'Hagan, Minako, and David Ashworth)** मानव समाजाच्या उत्क्रांतीत भाषेने समाजाला एकत्र आणण्याचे, ज्ञानाचे हस्तांतरण करण्याचे आणि संस्कृती जपण्याचे काम केले आहे. परंतु जगात सुमारे ७००० हून अधिक भाषा अस्तित्वात असल्याने भाषांमधील संवाद शक्य व्हावा यासाठी भाषांतर आवश्यक ठरते. भाषांतर ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती संस्कृती, विचार, भावना आणि संदर्भांचे रूपांतर असते. भूतकाळात हे कार्य विद्वानांनी

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

हाताने केले; त्यासाठी वेळ, कौशल्य आणि सांस्कृतिक जाण आवश्यक होती. पण डिजिटल युगात ही प्रक्रिया झपाट्याने बदलली आहे. भाषा ही मानवाच्या संवादाचा आत्मा आहे. **(Cronin, Michael.)** एक समाज दुसऱ्या समाजाशी, एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीशी जोडणारे साधन म्हणजे भाषा. परंतु जगात विविध भाषा अस्तित्वात असल्याने संवादात अडथळे निर्माण होतात. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी भाषांतर हे माध्यम निर्माण झाले. पूर्वी भाषांतर हे हाताने केलेले, मेहनतीचे आणि वेळखाऊ कार्य होते. परंतु आज डिजिटल तंत्रज्ञानामुळे भाषांतराच्या प्रक्रियेत वेग, अचूकता आणि सुलभता आली आहे. संगणकीय प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता, आणि विविध ऑनलाइन अनुप्रयोगांनी भाषांतर क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. आज इंटरनेट, सोशल मीडिया, ई-कॉमर्स, ऑनलाइन शिक्षण, आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या सर्व क्षेत्रांमध्ये भाषांतराची गरज वाढली आहे. **(Bowker, Lynne, and Jennifer Fisher.)**"ग्लोबलायझेशन"च्या युगात "लोकलायझेशन" म्हणजे स्थानिक भाषांमधून माहिती पोहोचविण्याची आवश्यकता वाढत चालली आहे. त्यामुळे डिजिटल युगात भाषांतराचे महत्त्व केवळ भाषिक नव्हे तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही अधिक अधोरेखित झाले आहे.

डिजिटल युगाने भाषांतराच्या कार्यात वेग, सुलभता आणि व्यापकता आणली आहे. परंतु त्याच वेळी अचूकतेचा अभाव, सांस्कृतिक संवेदनशीलतेची कमतरता आणि मानवी भावनांच्या हरवण्यासारखी आव्हाने देखील निर्माण केली आहेत.

अभ्यासाची गरज (Need and Importance of Study)

प्रस्तुत संशोधन अभ्यासाची गरज खालील मुद्द्याच्या आधारे सविस्तर स्पष्ट करता येतील:

१. **संवादाची जागतिकीकरणात गरज:** जगभरातील लोक विविध भाषांत बोलतात. एकसंध संवादासाठी भाषांतर अपरिहार्य झाले आहे.

२. **डिजिटल माध्यमांतील वाढ:** इंटरनेटवरील मजकूर, व्हिडिओ, माहिती यांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या सर्व सामग्रीचे विविध भाषांमध्ये रूपांतर आवश्यक आहे.

३. **शैक्षणिक व संशोधनात्मक कारणे:** विद्यार्थ्यांना व संशोधकांना परभाषेतील साहित्य समजण्यासाठी भाषांतराची मदत होते.

४. **व्यापार आणि अर्थव्यवस्थेतील भूमिका:** कंपन्यांना आंतरराष्ट्रीय ग्राहकांशी संवाद साधण्यासाठी बहुभाषिक वेबसाइट्स आणि जाहिरातींची गरज भासते.

५. **संस्कृतींच्या देवाणघेवाणीची वाढ:** भाषांतरामुळे जगभरातील संस्कृती, साहित्य आणि विचारप्रवाह एकमेकांशी जोडले जातात.

६. **मानवी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा संगम:** तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण भाषांतर कसे साधता येईल, याचा शोध घेणे.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश म्हणजे डिजिटल युगात भाषांतराच्या स्वरूपातील बदलांचा अभ्यास करणे, त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम जाणून घेणे आणि त्यावर योग्य उपाय सुचवणे.

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषांतराच्या विविध व्याख्या (Definitions of Translation):

(Gambier, Yves, and Luc van Doorslaer,) भाषांतर म्हणजे एक भाषेतील विचार, अर्थ आणि भावना दुसऱ्या भाषेत प्रभावीपणे मांडण्याची कला. अनेक विद्वानांनी याबाबत विविध व्याख्या दिल्या आहेत.

१. **जॉन ड्रायडन (1667):** "Translation is the art of transferring sense from one language to another."

२. **पीटर न्यूमार्क (1981):** "Translation is rendering the meaning of a text into another language in the way that the author intended."

३. **मराठी परिभाषा: (Bowker, et al)** भाषांतर म्हणजे मूळ भाषेतील आशय, विचार, शैली आणि भावनांना शक्य तितक्या जवळच्या पद्धतीने दुसऱ्या भाषेत रूपांतर करणे. डिजिटल युगात या व्याख्या अधिक व्यापक झाल्या आहेत कारण भाषांतर आता फक्त "शब्दांचे रूपांतर" नसून, ते "माहितीचे रूपांतर" (Information Transformation) झाले आहे.

४. संशोधनाची उद्दिष्टे व त्याचे समर्थन (Objectives of the Study and its Justification)

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे उद्दिष्टे घेतली असून त्याचे समर्थन पुढीलप्रमाणे:

अ. क्र	संशोधनाची उद्दिष्टे	समर्थन
१	डिजिटल युगात भाषांतराच्या संकल्पनेतील बदलांचा अभ्यास करणे.	पारंपरिक भाषांतर आणि आधुनिक डिजिटल भाषांतर यांमधील फरक व विकास समजून घेणे.
२	नवीन डिजिटल साधने आणि मॉडेल्सचा (AI, NMT, Google Translate इत्यादी) उपयोग व प्रभाव विश्लेषित करणे.	या तंत्रज्ञानामुळे भाषांतराच्या प्रक्रियेत झालेल्या परिवर्तनांचा अभ्यास करणे.
३	भाषांतराच्या गुणवत्तेवर आणि अचूकतेवर डिजिटल तंत्रज्ञानाचा परिणाम तपासणे.	मशीन भाषांतरातील त्रुटी, मर्यादा आणि सुधारणा क्षेत्रांचा शोध घेणे.
४	डिजिटल भाषांतरामुळे निर्माण झालेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक संधी व आव्हानांचा अभ्यास करणे.	भाषांतराचे योगदान शिक्षण, व्यवसाय आणि संस्कृतींमध्ये ओळखणे.
५	भविष्यातील भाषांतर क्षेत्रासाठी मानवी सर्जनशीलता आणि तांत्रिक प्रगती यांचा समन्वय साधण्याचे मार्ग सुचवणे.	अधिक अचूक, भावनापूर्ण आणि नैतिक भाषांतरासाठी शिफारसी मांडणे.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

संशोधन पद्धती (Research Methodology):

प्रस्तुत संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) आणि वर्णनात्मक (Descriptive) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

अ) **सामुग्री संकलनाचे स्त्रोत:** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ऑनलाइन संशोधन लेख, डिजिटल भाषांतर साधने, भाषांतर तज्ञांची मते, विद्यमान साहित्य आणि केस स्टडीज यांचा वापर केला आहे.

ब) **सामुग्री विश्लेषण:** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने विविध डिजिटल साधनांचे तुलनात्मक विश्लेषण, तसेच त्यांचे परिणाम, अचूकता आणि मर्यादा यांचा अभ्यास केला आहे .

क) **मर्यादा:** प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने मराठी, इंग्रजी आणि काही जागतिक साधनांपुरते मर्यादित आहे.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेली साधने व मॉडेल्स (Tools and Models of Digital Technology):

(Cronin, Michael.) डिजिटल युगात भाषांतर क्षेत्रात खालील तांत्रिक साधने आणि मॉडेल्स विकसित झाली आहेत:

१. **मशीन ट्रान्सलेशन (Machine Translation):** संगणकाच्या मदतीने भाषांतर करणारी तंत्रज्ञान प्रणाली. सुरुवातीच्या काळात "रुल-बेस्ड मॉडेल्स" वापरले जात होते, पण आता न्युरल नेटवर्क आधारित प्रणाली प्रभावी ठरल्या आहेत.

२. **न्युरल मशीन ट्रान्सलेशन (NMT):** AI आणि डीप लर्निंगवर आधारित ही पद्धत संदर्भ समजून भाषांतर करते. Google Translate आणि DeepL याच तंत्रावर आधारित आहेत.

३. **CAT Tools (Computer Assisted Translation):** SDL Trados, Wordfast, MemoQ यांसारख्या साधनांमुळे भाषांतरातील सातत्य आणि शब्दसंग्रहाची एकसंधता राखली जाते.

४. **ऑनलाइन साधने आणि ॲप्स:** Google Translate, Microsoft Translator, Yandex, Linguee, ChatGPT इत्यादी साधनांनी भाषांतर सर्वसामान्यांच्या हातात दिले.

५. **AI आधारित मॉडेल्स: (Kenny, Dorothy,)** ChatGPT, Gemini, Claude सारख्या आधुनिक मॉडेल्स संदर्भाधारित आणि भावनात्मक भाषांतर करण्यास सक्षम होत आहेत.

७. **डिजिटल युगातील भाषांतराचे सकारात्मक परिणाम (Positive Impacts)**

१. **वेग आणि सुलभता:** काही सेकंदांत भाषांतर शक्य झाले.

२. **ज्ञानप्रसारात वाढ:** माहिती विविध भाषांमध्ये उपलब्ध झाल्याने जागतिक शिक्षणाचा विस्तार झाला.

३. **व्यावसायिक संधी:** फ्रीलान्स भाषांतरकारांना आणि कंटेंट क्रिएटर्सना नवीन रोजगार मिळाले.

४. **संस्कृतींचे जवळिकीकरण:** विविध देशांच्या साहित्याचा परस्पर परिचय झाला.

५. **शिक्षणात मदत:** विद्यार्थ्यांना परभाषेतील साहित्य समजणे सुलभ झाले.

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

६. **बहुभाषिक संवाद:** आंतरराष्ट्रीय बैठका, वेबसाईट्स आणि माध्यमे सर्वांसाठी खुली झाली. परिषद, ईमेल, वेबसाईट्स आणि सोशल मीडियावर भाषेची अडचण कमी झाली.

नकारात्मक परिणाम आणि आव्हाने (Negative Impacts and Challenges):

१. **अचूकतेचा अभाव:** डिजिटल साधनांमधून केलेले भाषांतर नेहमीच अर्थपूर्ण किंवा सांस्कृतिकदृष्ट्या योग्य नसते. साहित्यिक भाषांतरात चुकीचा अर्थ लागू शकतो.

२. **मानवी भाषांतरकारांचा रोजगार धोक्यात:** स्वयंचलित साधनांमुळे पारंपरिक भाषांतर व्यवसायाला स्पर्धा निर्माण झाली आहे. काही प्रमाणात मानवी भाषांतरकारांची मागणी कमी झाली आहे.

३. **भावनात्मकता आणि शैली हरवणे:** मशीन भाषांतर भावनिक सूक्ष्मता पकडू शकत नाही. मानवी संवेदनशीलता मशीन समजू शकत नाही.

४. **गोपनीयतेचा धोका:** ऑनलाइन साधनांमधील मजकूर सुरक्षित न राहण्याची शक्यता असते.

५. **तांत्रिक अवलंबित्व:** माणसे स्वतःची भाषिक कौशल्ये वापरत नाहीत.

६. **संस्कृतींचे अपभ्रंश:** स्वयंचलित भाषांतरामुळे सांस्कृतिक अर्थ हरवतो.

७. **गोपनीयतेचा प्रश्न:** ऑनलाइन साधनांमध्ये दिलेली माहिती सुरक्षित राहतेच असे नाही.

समारोप (Conclusion):

डिजिटल युगात भाषांतराने संवादाच्या सर्व परंपरागत सीमांना छेद दिला आहे. **(गोडबोले अच्च्युत)** एकेकाळी कठीण आणि वेळखाऊ वाटणारे भाषांतर आता एका क्लिकवर शक्य झाले आहे. मात्र, या सुलभतेबरोबर काही नैतिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक प्रश्नही उपस्थित झाले आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी सर्जनशीलतेचा मिलाफ हा भाषांतराचा नवा टप्पा ठरेल. मानवाच्या भावनिक समजुतीला तंत्रज्ञानाची गती जोडल्यास भाषांतर अधिक अर्थपूर्ण, विश्वसनीय आणि जागतिक संवादासाठी उपयुक्त ठरेल. म्हणूनच डिजिटल युगातील भाषांतर हे केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून मानवसंवादाचा, संस्कृतींच्या समरसतेचा आणि ज्ञानाच्या विस्ताराचा अत्यावश्यक पूल आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, भाषांतर हे मानवी संवादाचे, ज्ञानविस्ताराचे आणि सांस्कृतिक जडणघडणीचे प्रमुख साधन आहे. डिजिटल युगाने या प्रक्रियेला नवे आयाम दिले आहेत. AI आणि मशीन ट्रान्सलेशनमुळे भाषांतर सर्वांसाठी सुलभ झाले आहे. तथापि, तांत्रिक भाषांतराने मानवी भाषिक संवेदनशीलतेची जागा घेऊ शकत नाही. भविष्यातील भाषांतर क्षेत्रात मानवी सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समन्वय घडवून आणणे हे अत्यावश्यक आहे. अशा संतुलनातूनच भाषांतर केवळ तांत्रिक प्रक्रिया न राहता एक "संस्कृतीचे पूल" म्हणून कार्य करू शकेल.

संदर्भग्रंथ :

१) *Bowker, Lynne, and Jennifer Fisher. . Computer-Aided Translation Technology: A Practical Introduction. . University of Ottawa Press, 2010.*

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

२) *Cronin, Michael. . Translation Goes to the Movies. Routledge, 2010.*

३) *Cronin, Michael. Translation in the Digital Age. Routledge, .2013*

४) *Gambier, Yves, and Luc van Doorslaer,. Handbook of Translation Studies. John Benjamins Publishing Company, 2019.*

५) *Kenny, Dorothy, . Human Issues in Translation Technology: The IATIS Yearbook. Routledge, 2017.*

६) *O'Hagan, Minako, and David Ashworth. Translation-Mediated Communication in a Digital World: Facing the Challenges of Globalization and Localization. Multilingual Matters, 2016., 2016.*

७) *गोडबोले अच्च्युत .इंडस्ट्री ४ पुणे . ०.५ ते इंडस्ट्री ०. बुकगंगा प्रकाशन :, जानेवारी २०२३.*

Cite This Article:

डॉ. गावडे व. य. (2025). *डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 114–119).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

डिजिटल भाषांतर प्रणालीचा मराठी भाषेवरील परिणाम : अनुकूलता, मर्यादा आणि भाषिक संवेदनशीलतेचा अभ्यास

** डॉ. विक्रम जाधव व **डॉ. माळी बी. बी.*

** सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अँड आर्ट्स, पुणे- 02*

सारांश :

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात भाषेचा आणि डिजिटल साधनांचा परस्पर संबंध अधिकाधिक घट्ट होत चालला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि यांत्रिक शिक्षण (Machine Learning) यांच्या साहाय्याने विकसित झालेल्या डिजिटल भाषांतर प्रणालींनी जागतिक संवाद, ज्ञानप्रसार आणि साहित्यवाचनाची व्याप्ती प्रचंड वाढवली आहे. मराठी भाषेच्या संदर्भात पाहता, या प्रणालींमुळे साहित्याचा जागतिक प्रसार, अध्ययन-संशोधनाची सुलभता, आणि नव्या पिढीला बहुभाषिक साहित्याशी ओळख होण्याची संधी निर्माण झाली आहे. तथापि, या प्रगतीसोबत काही गंभीर आव्हानेही उद्भवली आहेत — जसे की भावार्थाचे विकृतीकरण, म्हणी-प्रचारातील सांस्कृतिक सूक्ष्मतेचा लोप, आणि लेखकाच्या मूळ शैलीचे विकेंद्रीकरण. या संशोधनाचा उद्देश या अनुकूल व प्रतिकूल परिणामांचा संतुलित अभ्यास करून भाषिक संवेदनशीलतेच्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर कसा करावा हे समजून घेणे हा आहे. अभ्यासातून हे स्पष्ट होते की डिजिटल भाषांतर हे आधुनिक मराठी साहित्याला जागतिक पटलावर स्थान देण्याचे प्रभावी साधन ठरू शकते, परंतु भाषेची आत्मीयता, भावार्थ आणि सर्जनशीलता टिकवण्यासाठी मानवी हस्तक्षेप, संपादन आणि तज्ज्ञ मार्गदर्शन अत्यावश्यक आहे.

***मुख्य संकल्पना** : डिजिटल भाषांतर, साहित्य परिणाम, अनुकूलता-विपर्यास, भाषिक संवेदनशीलता*

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रस्तावना :

आधुनिक काळात भाषेचा आणि तंत्रज्ञानाचा परस्पर संबंध अधिकाधिक दृढ होत आहे. डिजिटल युगात भाषांतराचे कार्य आता फक्त मानवी मर्यादित नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित प्रणालींच्या साहाय्याने अधिक व्यापक आणि वेगवान बनले आहे. मराठी साहित्य जगभर पोहोचविण्यासाठी या प्रणालींनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि, भाषांतर ही केवळ शब्दांतर नव्हे, तर भावार्थ, संस्कृती आणि संदर्भांचे रूपांतर असते. डिजिटल प्रणालींना हे सूक्ष्म भान नसल्यामुळे भाषेतील सर्जनशीलता आणि सौंदर्य कधी कधी हरवते. या पार्श्वभूमीवर या संशोधनात डिजिटल भाषांतर प्रणालींचा मराठी साहित्यावर झालेल्या अनुकूल आणि प्रतिकूल परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. डिजिटल भाषांतर प्रणालींच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
2. या प्रणालींमुळे मराठी साहित्याच्या प्रसारावर झालेल्या सकारात्मक परिणामांचे विश्लेषण करणे.
3. मराठी भाषेतील शैली, लय, आणि सांस्कृतिक अर्थांवर झालेल्या नकारात्मक परिणामांचे परीक्षण करणे.
4. भावी काळात डिजिटल भाषांतर अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाय सुचविणे.

चर्चा :

डिजिटल भाषांतर प्रणालींचा वापर गेल्या दशकात प्रचंड वाढला आहे. आज विद्यार्थी, संशोधक, आणि लेखक विविध भाषांतील साहित्य समजण्यासाठी या साधनांचा उपयोग करतात.

अ. अनुकूल परिणाम

आजच्या डिजिटल युगात भाषांतर प्रक्रियेने नवे रूप धारण केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि यांत्रिक शिक्षण (Machine Learning) यांच्या साहाय्याने विकसित झालेल्या डिजिटल भाषांतर प्रणालींनी भाषिक संवाद अधिक सुलभ आणि वेगवान बनवला आहे. Google Translate, Microsoft Translator, ChatGPT, DeepL यांसारख्या साधनांमुळे विविध भाषांमधील माहिती सहजपणे एकमेकांपर्यंत पोहोचू लागली आहे. मराठी भाषा, जी आपल्या संस्कृतीचे आणि विचारविश्वाचे प्रतीक आहे, तीही या डिजिटल क्रांतीत सक्रियपणे सहभागी झाली आहे. डिजिटल भाषांतर प्रणालींमुळे मराठी भाषेच्या प्रसाराला, अध्ययन-शोधनाला, आणि नव्या पिढीच्या भाषिक जाणिवांना नवे आयाम प्राप्त झाले आहेत. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा मराठी भाषेवर अनेक अनुकूल परिणाम दिसून येत आहेत, ज्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. मराठी साहित्य जागतिक स्तरावर सहज उपलब्ध झाले आहे

डिजिटल भाषांतर प्रणालींमुळे मराठी साहित्याच्या जागतिक प्रसाराला नवे दार खुले झाले आहे. पूर्वी मराठी साहित्य मुख्यतः मराठीभाषिक वाचकांपुरते मर्यादित होते, परंतु Google Translate, DeepL, ChatGPT, Microsoft Translator यांसारख्या साधनांच्या माध्यमातून मराठी साहित्य आता जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत आहे. मराठीतील कविता, कथा, निबंध, कादंबऱ्या इत्यादींचे इंग्रजी तसेच इतर भाषांमध्ये सहज भाषांतर होऊ लागल्याने जागतिक वाचकवर्गाला मराठी संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्ये समजण्याची संधी मिळत आहे. यामुळे मराठी साहित्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करण्यास आणि जागतिक साहित्याच्या प्रवाहात समाविष्ट होण्यास मदत झाली आहे. अशा प्रकारे डिजिटल भाषांतर प्रणालींनी मराठी साहित्याच्या जागतिक प्रसारासाठी एक प्रभावी माध्यम म्हणून काम केले आहे.

२. भाषांतर प्रक्रियेचा वेळ आणि खर्च कमी झाला आहे

पारंपरिक भाषांतर प्रक्रियेत मोठा वेळ, प्रयत्न आणि आर्थिक खर्च लागत असे. प्रत्येक वाक्याचे भाषिक, सांस्कृतिक आणि अर्थसंबंधी परीक्षण करावे लागत

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

असे, तसेच तज्ज्ञ भाषांतरकारांची मदत घ्यावी लागे. परंतु डिजिटल भाषांतर प्रणालींमुळे ही प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि जलद झाली आहे. केवळ काही सेकंदांत संपूर्ण दस्तऐवजाचे भाषांतर मिळू शकते. यामुळे प्रकाशक, संशोधक, विद्यार्थी, आणि लेखक यांचा वेळ आणि खर्च दोन्ही मोठ्या प्रमाणात वाचतो. विशेषतः शैक्षणिक संशोधनासाठी परकीय भाषांतील संदर्भ वाचताना ही प्रणाली उपयुक्त ठरते. यांत्रिक भाषांतर जरी परिपूर्ण नसले तरी प्राथमिक अर्थ समजून घेण्यासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरते. अशा प्रकारे डिजिटल भाषांतर प्रणालींनी भाषांतराच्या प्रक्रियेला अधिक कार्यक्षम, जलद आणि खर्चिकदृष्ट्या फायदेशीर बनवले आहे.

३. वाचन, अध्ययन आणि संशोधनाची सुलभता वाढली आहे

डिजिटल भाषांतरामुळे शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात ज्ञानप्राप्तीचे दरवाजे अधिक खुले झाले आहेत. मराठी भाषेतील विद्यार्थ्यांना आता परकीय भाषांतील संशोधन लेख, संदर्भग्रंथ, आणि तांत्रिक साहित्य समजणे सोपे झाले आहे. तसेच मराठी साहित्याचे इंग्रजी किंवा हिंदी भाषांतर उपलब्ध झाल्याने देशभरातील आणि जगभरातील संशोधकांना मराठी साहित्याचा अभ्यास करणे सोपे झाले आहे. संशोधनासाठी लागणारे स्रोत आता डिजिटल स्वरूपात आणि भाषांतरित रूपात उपलब्ध असल्यामुळे अध्ययनाची व्याप्ती वाढली आहे. उदाहरणार्थ, मराठी दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण कथा किंवा लोककला यांसारख्या विषयांवरील जागतिक संशोधन वाढण्यास या प्रणालींनी हातभार लावला आहे. त्यामुळे ज्ञानविस्तार आणि संशोधनात डिजिटल भाषांतर प्रणाली महत्त्वपूर्ण साधन ठरली आहे.

४. नव्या पिढीला विविध भाषांतील साहित्याचा परिचय मिळत आहे

डिजिटल भाषांतर प्रणालींचा सर्वात व्यापक परिणाम म्हणजे नव्या पिढीच्या भाषिक क्षितिजाचा विस्तार. आजची विद्यार्थी आणि युवा पिढी इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, फ्रेंच किंवा जपानी भाषांतील साहित्य काही क्षणांत मराठीत वाचू शकते. त्याचप्रमाणे, मराठी साहित्याचे भाषांतर इतर भाषांमध्ये झाल्यामुळे परभाषिक तरुणांनाही मराठी साहित्याशी परिचय होतो. यामुळे भाषिक अडथळे दूर होऊन सांस्कृतिक देवाणघेवाण सुलभ झाली आहे. विद्यार्थी जागतिक साहित्यिक प्रवाह, विचारधारा, आणि सांस्कृतिक विविधता समजून घेत आहेत. परिणामी, नव्या पिढीमध्ये साहित्याविषयीची जिज्ञासा, भाषिक आदरभाव, आणि आंतरसंस्कृतिक संवादाची क्षमता वाढली आहे. अशा रीतीने डिजिटल भाषांतर प्रणालींनी तरुण पिढीला बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक जाण देण्यास मोठा हातभार लावला आहे.

ब. प्रतिकूल परिणाम

डिजिटल भाषांतर प्रणालींनी भाषिक संवाद सुलभ केला असला, तरी त्या पूर्णपणे निर्दोष नाहीत. कृत्रिम बुद्धिमत्तेवर

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

आधारित या प्रणाली मानवी भाषिक जाण, भावनात्मकता, आणि सांस्कृतिक संदर्भ पूर्णपणे समजू शकत नाहीत. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीचे, परंपरेचे आणि भावविश्वाचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे शब्दांचा केवळ तांत्रिक अनुवाद केल्याने भाषेचा आत्मा हरवण्याची शक्यता निर्माण होते. याच कारणामुळे डिजिटल भाषांतर प्रणालींचे काही प्रतिकूल परिणाम मराठी भाषेवर आणि साहित्यावर दिसून येतात. खालील मुद्द्यांद्वारे या परिणामांचे सखोल विश्लेषण करता येईल.

1. **भावार्थाचा विकृतीकरण होण्याची शक्यता वाढली आहे.**

   भाषांतर ही प्रक्रिया केवळ शब्दांचे रूपांतर नसून ती अर्थ, संदर्भ आणि भावनांचा संप्रेषण आहे. डिजिटल भाषांतर प्रणाली शब्दशः अनुवाद करतात, पण त्या वाक्यातील भावार्थ, संदर्भ, आणि सांस्कृतिक संकेत समजून घेण्यात अपयशी ठरतात. उदाहरणार्थ, "मन सुटले तर घर सुटते" या मराठी वाक्याचा अर्थ केवळ "If the mind is free, the house is free" असा घेतला जातो, परंतु मूळ भावार्थ 'मन अस्थिर झाल्यास संसार विस्कळीत होतो' असा आहे. अशा प्रकारे डिजिटल भाषांतर प्रणाली भावार्थाचे विकृतीकरण करून मूळ आशय बदलतात. या विकृतीमुळे साहित्यिक रचनांचा अर्थच विकलांग होऊ शकतो. त्यामुळे भाषांतर करताना मानवी हस्तक्षेप किंवा संपादन आवश्यक ठरते, अन्यथा मराठी भाषेतील विचारसंपदा चुकीच्या अर्थाने मांडली जाण्याचा धोका कायम राहतो.

2. **मराठी भाषेतील वाक्प्रचार, म्हणी, लयी आणि संस्कृतीची सूक्ष्मता हरवते.**

   मराठी भाषेचे सौंदर्य तिच्या म्हणीं, वाक्प्रचारांमध्ये आणि सांस्कृतिक संदर्भांत दडलेले आहे. "उंटावरून शेळ्या हाकणे" किंवा "डोक्यावर पडणे" अशा म्हणींचा अर्थ केवळ शब्दांनी व्यक्त होत नाही, तर त्या सामाजिक-भावनिक संदर्भातून प्रकट होतात. डिजिटल भाषांतर प्रणालींना या संदर्भांचा आणि भाषिक लयींचा अंदाज नसतो. त्यामुळे त्या म्हणींचा अर्थ शब्दशः अनुवादित केला जातो आणि त्यामुळे मूळ वाक्याचा प्रभाव कमी होतो. उदाहरणार्थ, "उंटावरून शेळ्या हाकणे" या वाक्याचा इंग्रजी अनुवाद "To drive goats from a camel" असा होतो, जो शाब्दिकदृष्ट्या योग्य असला तरी अर्थदृष्ट्या निरर्थक ठरतो. त्यामुळे मराठी भाषेतील सांस्कृतिक सूक्ष्मता आणि भावात्मक लय डिजिटल भाषांतरामुळे हरवते.

3. **यांत्रिक भाषांतरात भावनात्मक आणि साहित्यिक सौंदर्याचा अभाव जाणवतो.**

   साहित्याचा गाभा म्हणजे भावना, संवेदना आणि कलात्मक अभिव्यक्ती. डिजिटल भाषांतर प्रणाली मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्यामुळे त्या भावनिक सूक्ष्मतेला ओळखू शकत नाहीत. परिणामी, काव्यात्मकता, अलंकारिकता आणि भावगर्भता हरवते. उदाहरणार्थ, शांता शेळके यांची कविता "मी

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

तुला शोधिते हृदयातून" या ओळीचा अनुवाद "I search you from the heart" असा होतो, परंतु मूळ मराठी ओळीत असलेली भावनिक तीव्रता आणि काव्यात्मक गूढता इंग्रजी भाषांतरात जाणवत नाही. अशा प्रकारे यांत्रिक भाषांतर साहित्यिक अभिरुची आणि कलात्मक अनुभव देण्यात अयशस्वी ठरते. त्यामुळे वाचकांना मूळ साहित्यातील भावस्पर्शी गोडवा अनुभवता येत नाही.

4. लेखकाच्या मूळ शैलीचे विकेंद्रीकरण होते.

प्रत्येक लेखकाची एक स्वतंत्र शैली, भाषाशैली आणि अभिव्यक्ती असते. त्यात विशिष्ट शब्दप्रयोग, वाक्यरचना, आणि भावनांची शैलीदार मांडणी असते. डिजिटल भाषांतर प्रणाली या शैलीगत वैशिष्ट्यांना ओळखू शकत नाहीत; त्या सर्व भाषेला एकसमान पद्धतीने हाताळतात. त्यामुळे लेखकाच्या वैयक्तिक शैलीचे विकेंद्रीकरण होते. उदाहरणार्थ, पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लिखाणातील सूक्ष्म हावभाव, भाषेतील चैतन्य आणि संस्कृतीसंदर्भ हे यांत्रिक भाषांतरात कोरडे आणि निर्जीव वाटतात. परिणामी, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आणि रचनेतील भावनात्मक प्रवाह हरवतो. ही एक गंभीर समस्या आहे, कारण शैली म्हणजेच लेखकाची ओळख असते. अशा परिस्थितीत डिजिटल भाषांतर मूळ सर्जनशीलतेचा गाभा हिरावून घेतो.

उदाहरणार्थ, कुसुमाग्रज, व.पु. काळे, शांता शेळके यांसारख्या साहित्यिकांच्या रचनांचे Google Translate द्वारे केलेले भाषांतर वाचताना भावार्थात तफावत स्पष्ट दिसते. या मर्यादा दूर करण्यासाठी मानवी संपादन (Human Post-Editing) आवश्यक ठरते.

क. संशोधन विषयाचे महत्त्व : डिजिटल भाषांतर प्रणालीचा मराठी भाषेवरील परिणाम

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात भाषा आणि डिजिटल साधने यांचे नाते अधिक घट्ट झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, यांत्रिक शिक्षण आणि नैसर्गिक भाषा प्रक्रिया यांच्या आधारे विकसित झालेल्या डिजिटल भाषांतर प्रणालींनी जगभरातील संवाद सुलभ, वेगवान आणि सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून दिला आहे. मराठी ही समृद्ध आणि संस्कृतीप्रधान भाषा या डिजिटल युगात नव्या संधी आणि आव्हानांचा सामना करत आहे. भाषांतर तंत्रज्ञानामुळे मराठी साहित्याचा जागतिक प्रसार झाला असला, तरी भावार्थ, शैली आणि सांस्कृतिक सूक्ष्मता हरवण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे. या संशोधनाचा उद्देश तंत्रज्ञान आणि भाषेच्या परस्परसंबंधाचा सखोल अभ्यास करणे आहे. डिजिटल भाषांतर प्रणाली ही केवळ तांत्रिक सोय नसून भाषिक संप्रेषणात आमूलाग्र बदल घडवणारी प्रक्रिया आहे. तिच्या माध्यमातून मराठी भाषेचा विकास, प्रसार आणि गुणवत्तेचे जतन यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे.

अशा प्रकारे, हे संशोधन केवळ भाषांतर प्रणालींचा परिणाम विशद करत नाही, तर मराठी भाषेच्या अस्तित्व, सर्जनशीलता आणि जागतिक ओळखीच्या जतनासाठी एक संवेदनशील दिशा सुचवते.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

१. तंत्रज्ञान आणि भाषेच्या नात्याचे मूल्यांकन

या संशोधनाचा मूलभूत हेतू म्हणजे तंत्रज्ञान आणि भाषेच्या परस्परसंबंधाचा सखोल अभ्यास करणे. डिजिटल भाषांतर प्रणाली ही केवळ तांत्रिक नवकल्पना नसून ती भाषिक संप्रेषणाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवणारी प्रक्रिया आहे. या संशोधनातून हे स्पष्ट करता येते की यंत्राधारित भाषांतरामुळे मराठी भाषेचा वापर कसा बदलतो, तिला नवे अभिव्यक्त माध्यम कसे प्राप्त होते, आणि त्याचवेळी तिची भाषिक शुद्धता व सौंदर्य कसे प्रभावित होते. तंत्रज्ञानाचा भाषेवर होणारा प्रभाव समजून घेणे म्हणजे भाषिक भवितव्याचा अंदाज घेणे, आणि म्हणूनच या अभ्यासाचे मूल्य अत्यंत महत्त्वाचे ठरते.

२. मराठी भाषेच्या अस्तित्व आणि सर्जनशीलतेचे संरक्षण

डिजिटल भाषांतर प्रणालींच्या वाढत्या वापरामुळे भाषेचा वापर यांत्रिक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत मराठी भाषेची ओळख, तिची सर्जनशीलता आणि तिचे सांस्कृतिक मूल्य जपणे आवश्यक ठरते. या संशोधनाद्वारे हे समजण्यास मदत मिळते की मराठी भाषेचे भावविश्व, अभिव्यक्ती आणि लय टिकवण्यासाठी कोणते घटक आवश्यक आहेत आणि डिजिटल माध्यमांचा वापर करताना कोणत्या मर्यादा लक्षात घ्याव्यात. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाषा अधिक समृद्ध करता येते, परंतु ती निर्जीव होऊ नये, हे संतुलन राखणे हाच या संशोधनाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

३. भाषिक संवेदनशीलता आणि गुणवत्तेचे जतन

भाषिक संवेदनशीलता म्हणजे शब्दांमधील भावना, सांस्कृतिक अर्थ आणि संदर्भ ओळखण्याची क्षमता. डिजिटल भाषांतर साधने ही संवेदनशीलता नेहमी जपतातच असे नाही. या संशोधनाचे महत्त्व असे आहे की ते तंत्रज्ञानाचा वापर करताना भाषिक संवेदनशीलता जपण्याचे मार्ग शोधते. संशोधनातून हे अधोरेखित होते की मराठी भाषेच्या सूक्ष्मतेला योग्य न्याय देण्यासाठी मानवी हस्तक्षेप, संपादन आणि भाषिक तज्ज्ञता आवश्यक आहे. अशा संशोधनामुळे भविष्यात विकसित होणाऱ्या भाषांतर प्रणाली अधिक सांस्कृतिकदृष्ट्या जागरूक आणि गुणवत्तापूर्ण बनू शकतात.

४. मराठी साहित्याचा जागतिक प्रसार

या संशोधनाचे एक मोठे महत्त्व म्हणजे मराठी साहित्याच्या जागतिक प्रसाराची संधी. डिजिटल भाषांतरामुळे मराठी साहित्य इंग्रजी, हिंदी, आणि इतर जागतिक भाषांमध्ये पोहोचते. या प्रक्रियेचे अध्ययन केल्याने मराठी भाषेच्या आंतरराष्ट्रीय स्वीकारार्हतेचा अंदाज घेता येतो. त्याचवेळी, संशोधनातून हे देखील समजते की जागतिक स्तरावर पोहोचताना भाषेचा मूळ भावार्थ, सांस्कृतिक संदर्भ आणि ओळख टिकवणे किती आवश्यक आहे. या संदर्भात संशोधन जागतिकीकरण आणि स्थानिकीकरण (globalization vs. localization) यांच्यातील संतुलन अधोरेखित करते.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

५. नवे तांत्रिक उपाय आणि भाषिक नवप्रयोगांची शक्यता

या संशोधनाद्वारे मराठी भाषेतील तांत्रिक प्रगतीला नवी दिशा मिळू शकते. भाषांतर प्रणालींच्या मर्यादा ओळखून त्यात सुधारणा करण्यासाठी स्थानिक भाषेच्या रचनेस अनुरूप अल्गोरिदम, शब्दसंग्रह डेटाबेस आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र विकसित करता येतील. अशा नवकल्पनांमुळे मराठी भाषेसाठी विशेष तयार केलेली, अधिक संवेदनशील आणि प्रभावी भाषांतर प्रणाली तयार होऊ शकतात. त्यामुळे संशोधन केवळ सैद्धांतिक नसून व्यावहारिक आणि तांत्रिक दृष्ट्याही उपयुक्त ठरते.

६. सांस्कृतिक ओळख आणि भाषिक स्वाभिमानाचे जतन

डिजिटल भाषांतराच्या युगात लहान भाषांचा आणि प्रादेशिक संस्कृतींचा आवाज हरवण्याचा धोका आहे. मराठीसारख्या समृद्ध भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी तिची सांस्कृतिक ओळख आणि भाषिक स्वाभिमान जपणे आवश्यक आहे. या संशोधनाचे महत्त्व असे आहे की ते मराठी भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीचे रक्षण करण्याचा संदेश देते. तंत्रज्ञानाचा वापर करताना भाषिक आत्मीयता कायम ठेवणे म्हणजेच भाषेचा आत्मा जपणे, आणि हे उद्दिष्ट या संशोधनातून पुढे येते. संशोधन विषयाचे महत्त्व हे केवळ भाषांतर प्रणालींच्या अभ्यासापुरते मर्यादित नाही, तर ते मराठी भाषेच्या भवितव्याशी संबंधित आहे. या अभ्यासामुळे भाषा, तंत्रज्ञान आणि संस्कृती यांच्यातील संतुलन समजून घेता येते. त्यामुळे मराठी भाषा जागतिक स्तरावर सक्षमपणे उभी राहू शकते आणि तिचा आत्मीय भावार्थ टिकवून ठेवता येतो.

निष्कर्ष :

डिजिटल भाषांतर प्रणालींनी मराठी भाषेला जागतिक व्यासपीठावर नेण्याची ऐतिहासिक संधी दिली आहे. या तंत्रज्ञानामुळे साहित्याचा प्रसार, संशोधनाची गती, आणि ज्ञानसुलभता वाढली आहे. परंतु, केवळ वेग आणि सुलभता यांच्यामुळे भाषेचा आत्मा, भावार्थ आणि सांस्कृतिक ओळख हरवू नये, हे तितकेच महत्त्वाचे आहे. डिजिटल भाषांतर ही तांत्रिक क्रांती असली, तरी ती भाषिक आणि सांस्कृतिक संवेदनशीलतेशी संतुलित असली पाहिजे. मराठी भाषेचे मूळ सौंदर्य, शैली, आणि भावनिक परिमाण टिकवण्यासाठी मानवी भाषाज्ञान आणि तांत्रिक बुद्धिमत्ता यांचा समन्वय आवश्यक आहे. म्हणूनच, भविष्यातील भाषांतर प्रणाली विकसित करताना स्थानिक भाषेच्या वैशिष्ट्यांना ओळखणारे आणि सांस्कृतिक संदर्भ जपणारे अल्गोरिदम विकसित करणे ही काळाची गरज आहे.

या संशोधनाचा मुख्य निष्कर्ष असा आहे की —

"डिजिटल भाषांतर तंत्रज्ञान मराठी भाषेला जागतिक बनवू शकते, परंतु तिची आत्मीयता टिकवण्यासाठी मानवी संवेदनशीलता आवश्यक आहे."

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

संदर्भसूची :

1. *देशमुख, स. (2022). भाषांतर सिद्धांत आणि व्यवहार. पुणे सकस पब्लिकेशन्स.*
2. *Joshi, M. (2021). Digital Translation and Indian Languages. New Delhi Sage Publications.*
3. *Kale, R. (2020). Marathi Literature in Digital Age. Mumbai Popular Prakashan.*
4. *Google AI Blog (2023). Advances in Neural Machine Translation.*
5. *Patil, A. (2024). Marathi Language and AI-based Translation Systems. Journal of Linguistic Studies, Vol. 5(3), pp. 45–59.*

Cite This Article:

डॉ. जाधव वि. व. डॉ. माळी बी. बी. (2025). *डिजिटल भाषांतर प्रणालीचा मराठी भाषेवरील परिणाम : अनुकूलता, मर्यादा आणि भाषिक संवेदनशीलतेचा अभ्यास.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 120–127).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भाषांतर व अनुवाद: स्वरूप व वैशिष्ट्ये

** डॉ. शामराव ला. गायकवाड*

** मराठी विभागप्रमुख, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे ४११०१८*

सारांश :

भाषांतर म्हणजे काय? तर दुस-या भाषेतील ज्ञान आपल्या भाषेत आणणे. त्यासाठी ज्ञान म्हणजे काय? आणि त्याची गरज काय? याचा उलगडा होणे आवश्यक आहे. ज्ञान म्हणजे काय? तर विविध प्रकारचे कौशल्य. ज्ञान कशातून प्राप्त होते तर मानवी जीवनातील सामुहिक कृतीतून संस्कृतीच्या रूपाने प्रवाहित झालेले असते. आणि ते मानवी समूहातील आचार-विचार, रूढी-परंपरा, मौखिक व लिखित स्वरूपातील संग्रहातून उपलब्ध होतं. मानवी जीवनातील प्रत्येक पिढीला मागच्या ज्ञानसंचय हे सहजपणे उपलब्ध झालेलं असतं. त्यासाठी भाषिक कौशल्य आत्मसात करण्याची आवश्यकता असते. 'समजणे, लिहिणे, बोलणे, वाचणे ही सर्व भाषेची प्राथमिक वैशिष्ट्ये आहेत. रूपांतर करणे, विस्तार करणे, संक्षेप करणे पुनर्लेखन करणे, भाषांतर करणे अशी अनेक भाषेची प्रगत वैशिष्ट्ये आहेत.'१

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

या प्रक्रियेत भाषांतर आणि अनुवाद असे दोन शब्द वापरले जातात. या दोनही संकल्पनेतील वेगळेपण काय? हे ही समजून घेणे आवश्यक आहे. भाषांतर आणि अनुवाद या संकल्पनांचा वापर करीत असताना अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. डॉ. विजया देव यांनी आपल्या 'भाषांतर विद्या' या लेखात लिहितात, "अनुवाद करणे ही सुसंस्कृत वाचकाची एक स्वाभाविक प्रतिक्रिया असते. चांगले काही वाचले की ते दुस-याला सांगावे या ऊर्मीतून अनुवादक्रियेला चालना मिळते..... तेव्हा त्या साहित्यकृतीचा आस्वाद इतरांना घेता यावा म्हणून हा वाचक साध्यभाषेत तिचे भाषांतर करतो..... ललित साहित्याच्याच नव्हे, तर दैनंदिन व्यवहाराच्या सर्वच क्षेत्रात जिथे जिथे भाषा समजण्याची अडचण निर्माण होते तिथे मूळ भाषेतून साध्यभाषेत अनुवाद करून घेऊन या अडचणीचे आपण निवारण करतो. ही अन्यभाषिक अनुवादक्रिया म्हणजेच भाषांतर."[२] यावरुन अनुवादक्रिया म्हणजे साधन व भाषांतर म्हणजे साध्य असा अर्थ याठिकाणी अपेक्षित आहे. याच लेखात त्या पुढे असेही लिहितात, "अनुवादकाला भाषांतर क्रियेत पदोपदी असे निर्णय घ्यावे लागतात. ते भाषासापेक्ष आणि आशय – विषयसापेक्ष असतात. मूळभाषा आणि साध्यभाषा या जोडीतील भाषांच्या संरचना, त्यांचे स्वभाव यांच्याशी तसेच मूळपाठ्याशी ते निगडीत असतात."[३] या

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

ठिकाणी अनुवादक हा भाषांतराची क्रिया करतो असा शब्दप्रयोग केलेला आहे. यावरून अनुवाद ही क्रिया आहे की भाषांतर ही क्रिया आहे यात एकवाक्यता दिसून येत नाही. डॉ. संजय लांडगे यांनी भाषांतराविषयी भाष्य करताना डॉ. विजया देव यांच्याच विचारांचे अनुकरण केलेले आहे. ते लिहितात, "आपल्या दैनंदिन व्यवहारात ज्या ज्या वेळी भाषा समजण्यामध्ये अडचण निर्माण होते तेथे मूळ भाषेतून साध्य भाषेत अनुवाद करता येतो. अशा या अनुवाद प्रक्रियेलाच भाषांतर असे म्हणतात."[४] यावरून डॉ. संजय लांडगे यांनी अनुवाद ही भाषांतर प्रक्रियेतील क्रिया आहे असे म्हटलेले आहे.

मराठी चित्रपट दिग्दर्शक प्रसाद नामजोशी यांनी नामवंत जाहिराततज्ञ पीयुष पांडे यांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणींवर भाष्य करताना ते लिहितात, "निमित्त होतं 'पांडेपुराण' या मी केलेल्या 'पांडेमोनियम' या त्यांच्या इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवादाच्या प्रकाशनाचं. तेव्हा ते आवर्जून पुण्यात आले होते." या ठिकाणी श्री. नामजोशी यांनी इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद असा शब्द वापरलेला आहे. त्याच ठिकाणी ते पुढे लिहितात, " मनोविकास प्रकाशनाला मराठी भाषांतराचे हक्क देताना ते भाषांतर वाचून योग्य वाटल्यासच प्रकाशित करण्याची अट त्यांनी घाटली होती."[५] या ठिकाणी मात्र त्यांनी भाषांतर असा शब्दप्रयोग केलेला आहे. याचाच अर्थ भाषांतर हे साध्य व अनुवाद हे क्रिया साधन असा अभिप्रेत आहे का? असा सभ्रम निर्माण होतो.

डॉ. लीला गोविलकर व डॉ. जयश्री पाटणकर यांनी भाषांतर म्हणजे काय? याविषयी विवेचन करताना लिहितात की, "भाषांतर शब्दाचा अर्थ सांगायचा तर दुसरी भाषा एवढाच आहे. 'अन्य भाषा इति भाषातरम् |' म्हणजे 'एका भाषेच्या आशयाला अन्य भाषेत आणणे.' एवढाच अर्थ सांगावा लागतो."[६] डॉ. लीला गोविलकर व डॉ. जयश्री पाटणकर यांनी भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशाय दुस-या भाषेत आणणे असा साधा सोपा अर्थ सांगून भाषांतराच्या स्वरूपाविषयी विवेचन केले आहे.

डॉ. उज्ज्वला जोगळेकर यांनी 'भाषातर व अनुवाद' या लेखामध्ये सदर घटकांविषयी विवेचन करताना ते लिहितात, "एकापेक्षा जास्त भाषा येणा-याने त्यातील एकच भाषा येणा-याला समजावे म्हणून दुस-या भाषेत व्यक्त झालेले विचार वा उद्गार त्याला समजणा-या भाषेत सांगण्याची प्रक्रिया, हा या लेखाचा विषय आहे. या प्रक्रियेसाठी 'भाषांतर' व 'अनुवाद' हे शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत. 'लिखित मसुद्याचे ते भाषांतर व मौखिक अभिव्यक्तीचा तो अनुवाद."[७] डॉ. उज्ज्वला जोगळेकर यांनी भाषांतर व अनुवाद या दोनही घटकांविषयी जे जे लिखित स्वरूपातील आहे ते दुस-या भाषेमध्ये आशयाच्या अंगाने जसेच्या तसे आणणे म्हणजे भाषांतर. आणि मौखिक स्वरूपातील संभाषण मदत करण्याच्या उद्देशाने दुभाषीकाची भूमिका पार पाडणे म्हणजे अनुवाद, अशी भूमिका मांडली आहे. याविषयी सविस्तरपणे मांडणी करताना डॉ. जोगळेकर यांनी, "भाषांतर करणं म्हणजे अभिव्यक्तीमागील संकल्पना लक्षात घेऊन त्या संकल्पनेची दुस-या भाषेच्या अभिव्यक्तीच्या धाटणीनुसार मांडणी करणं."[८] भाषांतर करीत असताना मूळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत आणणे जिकिरीचे असते. कारण प्रत्येक

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

भाषेतील भाषिक संकल्पना व अभिव्यक्तीच्या रचनापद्धती वेगवेगळ्या असतात. त्यामुळे एका भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, प्रादेशिक अनुबंध दुस-या भाषेत आणत असताना मूळ स्वरूपातील सांकेतिक सारतत्त्व दुस-या भाषेत आणताना नेमकेपणाने शब्दबद्ध करणे जिकिरीचे असते. भाषांतर प्रक्रियेत आकलनाची प्रक्रिया ही मेंदूच्या पातळीवर घडत असते. आकलनाच्या प्रक्रियेतील सारतत्त्व जेवढे परिपक्व तेवढी भाषांतराची लक्ष्य भाषेतील अभिव्यक्ती ही परिपूर्णतेकडे जाणारी असते किंवा परिपूर्ण असेल असे म्हणता येईल.

भाषांतर या संकल्पनेबरोबरच 'अनुवाद' या संकल्पनेविषयी भाष्य करीत असताना डॉक्टर उज्वला जोगळेकर यांनी 'अनुवाद' म्हणजे मौखिक स्वरूप अशीच भूमिका मांडली आहे. ते लिहिताना, "अनुवाद या शब्दाची फोड केली तर अनु म्हणजे मागाहून आणि वाद हे वद धातूचे रूप. अर्थात 'मागाहून सांगितलेले' असा अनुवाद या शब्दाचा अर्थ होतो. interpretation जसे लिखित मसुद्याचे असते तसेच, मौखिक भाषणाचेही असते. किंबहुना मौखिक संभाषणाच्या भाषांतराला अनुवाद संबोधणे अधिक संयुक्त राहील. वक्त्याच्या बोलण्यापासून ताबडतोब सांगितलेल्या त्याच्या म्हणण्याचा घोषवारा असेच त्याचे स्वरूप असते."[९] यावरून दुभाषकाची भूमिका ही अनुवादकाची आहे. असे विचार डॉ. जोवळेकर यांनी मांडलेले आहे.

अशा वेगवेगळ्या अभ्यासकांची भूमिका जाणून घेतल्यानंतर भाषांतर आणि अनुवाद या संकल्पनाच्या सीमारेषा अधोरेखित करणे आवश्यक आहे. या दोन्ही संकल्पनांमधील सीमारेषा अस्पष्ट आहे. त्यामुळे बहुतांश अभ्यासकांमध्ये गोंधळाची स्थिती आहे. म्हणून यांविषयी विवेचन करीत असताना नेमकेपणाची भूमिका मांडताना दिसत नाहीत. संभ्रमावतेत सापडल्याप्रमाणे कधी भाषांतर व कधी अनुवाद असा शब्दप्रयोग करताना आपण पाहतो.

भाषांतर म्हणजे केवळ संस्कृतीच्या अंगाने विचार केला तर भाषांतर म्हणजे दुसरी भाषा. प्रत्यक्षात मात्र भाषांतर ही संज्ञा एका विशिष्ट प्रकारच्या संप्रेषणाकरिता वापरण्यात येते. ज्यामध्ये एका भाषेमध्ये निर्मिलेल्या संहितेचा ग्रहणकर्ता दुसऱ्या भाषेमध्ये त्याच आशियाच्या संहितेची पुनर्निर्मिती करतो व संप्रेषण पूर्ण करतो. थोडक्यात म्हणजे एका भाषेच्या सहाय्याने निर्माण झालेल्या आशयाची पुनरावृत्ती दुसऱ्या भाषेत करणे याला भाषांतर म्हणता येईल.

इंग्रजीमध्ये ट्रान्सलेशन म्हणजे भाषांतर व अनुवाद अशा दोन्हीही अर्थाने वापरला जातो. आणि interpretation (इंटरप्रिटिशन) अर्थातंर करणे असा अर्थ देण्यात आलेला आहे. यावरून भाषांतर आणि अनुवाद या शब्दांत फारसा फरक मानला जात नाही. तरीही एका भाषेतील मजकूर जसाच्या तशा पद्धतीने दुसऱ्या भाषेत सादर करणे. म्हणजेच एका भाषेतील निर्मिती दुसऱ्या भाषेत त्याच आशयाची पुनर्निर्मिती करणे याचा अर्थ भाषांतर करणे असा होतो. मूळ भाषेतील आशय दुसऱ्या भाषेतील समान धर्मीय शब्द, वाक्य उपयोजून मूळ आशयाशी फारकत न घेणे, पुनरावृत्त करणे म्हणजे भाषांतर होय. मूळ आशयाला अधिकाधिक जवळ रहात किंवा दुसऱ्या भाषेतील शब्दांची योजना करीत असताना मूळ भाषेतील संप्रेषणाच्या भाषिक आशयाला जास्तीत जास्त जवळ नेण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे व्यावहारिक जगताशी निगडीत अशा भाषिक व्यावहाराशी

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

भाषांतरक्रीयेचा जास्तीत जास्त उपयोग होतो. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, कायदा, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विषयांतील तांत्रिक संकल्पनेशी निगडित ग्रंथाचे भाषांतर करीत असताना वस्तुनिष्ट स्वरूपात भाषांतर करणे अपेक्षित असते. म्हणून त्या त्या विषयाशी निगडित परिभाषिक संज्ञांचे भाषांतर करीत असताना शास्त्रशुद्ध परिभाषिक संज्ञांची निर्मिती करणे किंवा नेमकेपणाने संकल्पनाची योजना करणे आवश्यक असते. दोन किंवा दोन पेक्षा अधिक भाषिक जाणकारांकडून लिखित स्वरूपातील संहितेचे रूपांतर मूळ स्वरूपात दुसऱ्या भाषेत पुननिर्मित करण्याचा प्रयत्न केला जातो. मूळ भाषेतील विचारधन जसेच्या तसे दुसऱ्या भाषेत पोचविण्याचा भाषिक प्रपंच मांडला जातो त्यालाच भाषांतर म्हणता येईल. तसेच भाषिक व्यवहारांमध्ये स्फूट स्वरूपातील लेखन, जाहिराती, वाणिज्य क्षेत्रातील व्यवहार, आरोग्य, सरकारी कार्यालयातील पत्रव्यवहार इत्यादी विविध क्षेत्रातील व्यवहाराशी भाषांतर प्रक्रियेचा उपयोग होतो. याचाच अर्थ भाषांतर या संकल्पनेची व्याप्ती अर्थकारण, समाजकारण, राजकारण, दैनंदिन व्यवहार, कायदा व सुव्यवस्था इत्यादी घटकांच्या वैचारिकतेशी निगडित भाषिक व्यवहाराशी आहे. भाषांतर हे केवळ ग्रंथिक संहितेचे भाषानुकरण नसून भाषांतर हे भाषिक व्यवहारातील वैविध्यतेशी निगडित आहे. यामध्ये शब्दांनुवाद व भावानुवाद या दोनही घटकांचा अंतर्भाव होतो. मूळ भाषेतील भाव लक्ष भाषेत नेत असताना लक्ष भाषेतील शब्द, रूप, अर्थ, भावार्थ लक्षार्थ इत्यादी घटकांना अनुसरून किंवा भावार्थाच्या जास्तीत जास्त जवळ नेण्याचा प्रयत्न भाषांतराचा असतो. आणि लक्ष भाषेतील वाचकही विनासायास मूळ स्वरूपातील आशयाप्रमाणेच आस्वाद घेण्यात यशस्वी झाल्यास भाषांतरक्रिया यशस्वीपणे पार पडल्याचे म्हणता येईल.

साहित्यमूल्य असलेल्या कलाकृतीच्या भाषांतरक्रियेच्या बाबतीत संहितेला भावांनोवादाच्या जवळ नेताना अनेक अडचणी येऊ शकतात. लक्ष भाषेतील शब्दसौंदर्य मूळ भाषेतील व भाषासौंदर्याच्या जवळ जाणारे असलेच असे नाही. मूळ भाषेतील भावसौंदर्याच्या संक्रमणासाठी समर्पक शब्दसामुग्री जुळविण्यात यशस्वी झाल्यास भाषांतरक्रिया यशस्वी होईल यात दुमत नाही.

विशेषत: वैचारिक व शास्त्रीय स्वरूपातील लेखन प्रकारांचे भाषांतर करणे सोईचे व संयुक्तिक असते. अशा प्रकारच्या लेखनामध्ये पारिभाषिक संज्ञामूल्यांना अधिक महत्त्व असते. अशा संकल्पनांचा अर्थबोध होईल अशा प्रकारच्या शद्बांची निवड करणे आवश्यक असते. भाषांतराची क्रिया ही शब्दानुवादाला महत्त्व देते. त्यामुळे आपोआपच भावानुवादाला गौण स्थान प्राप्त होते.

अनुवादक्रियेमध्ये भाषांतरापेक्षा अधिक मोकळीक मिळते. एखाद्या कलाकृतीचे दुस-या भाषेत भावानुवाद करणे सोईचे ठरते. कारण मूळ कलाकृतीतील भावसौंदर्य लक्ष्य भाषेत आणत असताना शब्दानुवादाने इच्छित ललितसौंदर्य संक्रमित करणे अवघड आहे. ललित साहित्यामध्ये शब्दार्थापेक्षा भावार्थालाच अधिक महत्त्व असते. म्हणून ललित साहित्याचे रसानुवाद हे भावानुवादानेच शक्य आहे. म्हणून एखाद्या कलाकृतीचे लक्ष्य भाषेत संक्रमित करणे अनुवादप्रक्रियेनेच सोईचे होईल असे वाटते. त्याचबरोबर राष्ट्रिय व आंतराष्ट्रिय पातळीवरील बैठकांमध्येही दुभाषी म्हणून अनुवादकाची भूमिका महत्त्वाची असते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. संजय लांडगे, उपयोजित मराठी, दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, प्र. आ. १५ ऑगस्ट २०११, किंमत २५०/- , पृ. २३२.

२. डॉ. विजया देव, व्यावहारिक मराठी, संपा. डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वि. आ. ५ सप्टेंबर २००४, किंमत ५०/- पृ. ११४.

३. तत्रैव, पृ. ११६.

४. डॉ. संजय लांडगे, उपयोजित मराठी, दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, प्र. आ. १५ ऑगस्ट २०११, किंमत २५०/- , पृ. २३२.

५. प्रसाद नामजोशी, दै. सकाळ, शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५, लेख- 'सौंदर्यदृष्टी लाभलेला माध्यमकर्मी: पीयुष पांडे' , पृ. ७.

६. डॉ. लीला गोविलकर व डॉ. जयश्री पाटणकर, व्यावहारिक मराठी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आ. १ मार्च २००४, किंमत ५०/- पृ. १३०.

